महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संपादकीय ....

कविता ....

ज्ञानकोशकार डॉ. श्रीधरव्यंकटेश केतकर – पां.व. गाडगीळ ....

वारकऱ्यांच्या पंजाबातील वसाहती आणि ‘पंजाबातील नामदेव’ – रा.ना.

घोटाळे ....

ग्रंथसमालोचन ....

पत्रव्यवहार ....

संघवार्ता ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी वर्ष १० वें एप्रिल १९५५ अंक १ ला

श्री. भाऊजी दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

संपादकीय—

नवें वर्ष

विदर्भ साहित्य संघाचें वर्ष ३१ मार्च रोजीं संपतें. दरवर्षी मार्च महिना सुरू होण्यापूर्वीच संघाच्या वार्षिक निवडणुका पुऱ्या केल्या जातात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकींत श्री. बाबासाहेब खापर्डे हे संघाध्यक्ष म्हणून बहुमतानें निवडून आले. नव्या कार्यकारी मंडळानें नव्या वर्षाच्या कारकीर्दीची अधिकारसूत्रें आपल्या हातीं रीतसर घेतलीं आहेत.

'युगवाणी'चें संपादकत्व श्री. दि. ब. तथा भाऊसाहेब पंडित यांचेकडे देण्यांत आलें आहे. श्री. पंडित हे नागपुरांतील एक उत्तम शिक्षक व कळकळीचे सामाजिक कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचें संपादक मंडळ अद्याप जाहीर व्हावयाचें आहे. तरीपण संघाचें मुखपत्र या नात्यानें हें मासिक अधिक वाचनीय व उन्नत साहित्याभिरुचीच्या वृद्धीला अधिकाधिक उपकारक करण्याचें जें धोरण गेलीं कांही वर्षे चालू आहे त्यांत कसलाहि खंड न पडतां श्री. पंडित व त्यांचे सहकारी हें कार्य अधिक जोमानें पुढे चालवितील यांत शंका नाही.

विहंगमावलोकन

गेल्या वर्षाच्या मे महिन्याच्या अंकांत आता अधिकारनिवृत्त झालेल्या संपादकमंडळानें आपले संकल्प जाहीर केले होते. ते किती प्रमाणांत सफल झाले याची वाचकांना कल्पना करतां यावी यासाठी गेल्या महिन्याच्या, म्हणजे मार्च १९५५ च्या अंकांत आम्ही एप्रिल १९५४ ते मार्च १९५५ या कालावधींत युगवाणींत प्रकाशित झालेल्या बहुतांश लेखांची विषयवारीसहित व लेखकांच्या नांवांसहित अशी सूची प्रकाशित केलेली आहे. वि. सा. संघाचें मुखपत्र या नात्यानें 'युगवाणी'च्या मर्यादा ध्यानांत घेऊन आम्ही जे संकल्प केले होते त्यांचें स्वरूप येणेंप्रमाणें होतें—

"'युगवाणीं'त समग्र महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र यांच्या परिसरांत होणाऱ्या साहित्यिक चळवळींची माहिती देणें, इतर भारतीय भाषांतील साहित्य व साहित्यिकांचा परिचय करून देणें, आणि जागतिक वाङ्मयांतील उल्लेखनीय हालचालींचीहि थोडीबहुत दखल घेणें, असें स्थूल मानानें आमच्या नव्या संकल्पाचें स्वरूप आहे."

गेल्या महिन्याच्या अंकांत आम्ही जी सूची प्रकाशित केली आहे तिचें यथायोग्य निरीक्षण करणाऱ्यास हे आमचे संकल्प किती प्रमाणांत सफल झाले, याची यथार्थ कल्पना सहज येऊं शकेल. आमचे संकल्प पुरेशा प्रमाणांत जरी नसले तरी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सफल करण्याचा प्रयत्न आमच्या हातून झाला आहे, हें चोखंदळ वाचकांना देखील मान्य व्हावें, असें आम्हांस वाटतें. आमच्याकडे आलेल्या माहितीवरून मध्यप्रदेश व या प्रांताबाहेरच्या दूरदूरच्या नामवंत साहित्यिकांनी 'युगवाणी'च्या वाढत्या विकासाचें वरेंच कौतुक केलें आहे, हें सांगण्यास आम्हांला आनंद होत आहे.

'युगवाणी'च्या माध्यमांतून साहित्यिक व सांस्कृतिक असें किती तरी भरीव कार्य करतां येणें शक्य आहे. पण त्यासाठी अभ्यासू, व्यासंगी, पूर्वग्रहविरहित वृत्तीचे रसज्ञ व नियमितपणें लेखन करूं शकणाऱ्या अशा सरस्वतीपूजकांची आवश्यकता आहे. खुद्द नाग-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरांत व मध्यप्रदेशांत अशा गुणज्ञांची उणीव नाही. पण या कार्यासाठी द्यावा लागणारा विनामूल्य वेळ देऊं शकणाऱ्यांचीच उणीव आहे. विनामूल्य लेखनाचा काळ आता झपाट्याने मागे पडूं लागला आहे. आणि यांत वाईट वाटण्यासारखें कांही आहे, असें आम्हांस वाटत नाही. लेखक व कवी यांना फूल ना फुलाची पाकळी या रूपांत कांही ना कांही देण्याची योजना आखण्याचा काळ आता आला आहे. या दृष्टीने नवें संपादक मंडळ नव्या कार्यकारी मंडळाच्या साहाय्याने व संघाच्या सर्वसाधारण सभेच्या अनुमतीने एक पाऊल तरी पुढे टाकण्याचा यत्न करील अशी आम्ही आशा करतों.

आमच्या संपादक-मंडळाला ज्या लेखकांनी व कवींनी वेळोवेळीं साहाय्य केलें त्या सर्वांचे आम्ही अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

संपादक मंडळापैकीं श्री. पां. व. गाडगीळ, श्री. गो. रा. दोडके व प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांचें संपादन-कार्यांत विशेष महकार्य लाभलें हें नमूद करणें आवश्यक आहे. मला स्वतःला माझ्या संकल्पाप्रमाणें पुरेसें लेखन करतां आलें नाही, एवढेंच नव्हे, तर संपादनालाहि पुरेसा वेळ देतां आला नाही याबद्दल मी फार दिलगीर आहें.

—पु. य. देशपांडे

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २–४–०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १–४–०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १–८–०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री. पु. ल. देशपांडे	रु. २–०–०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री. नाना जोग	रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०–६–०
२. गडकऱ्यांचा विनोद	--श्री. द. रा. गोमकाळे	रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	--कविभूषण ब. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे	रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

चाहूल

'किती वैतागाने तुवां
होता झाडिला शिणगार
निरगायाने गळालें
पानपान भुईवर.

किती दिवस पाहिली
तुला तशीच विरक्त
मन राहिलें खिळून
वाळलेल्या पाचोळ्यांत.

कुणासाठी एवढ्यांत
झाली होतीस अपर्णा ?
कशासाठी सारें व्रत
आणि निष्ठूर साधना ?

आता कुठे पळसाने
तुझें फोडिलें गुपीत
आजवर लपलेलें
हसूं फुटे डहाळींत !

तेव्हा विरक्तीची ओढ
आता नटायाची घाई
आंब्यावर उमटली
तुझी न्यारी नवलाई !

आता बाकी ओळखलें
कशापायीं ही धांदल
—तुला आहे ना लागली
ऋतुराजाची चाहूल ?

--राम शेवाळकर

प्रीत

१

तव हृदयाच्या वीणेवर मी
होऊनि आलों गीत
त्या गीताच्या लय-लहरींतुन
ये क्षण एकच शांत
त्या शांतीच्या आवरणांतिल
तूं न जाणिली प्रीत !
(किंवा नाही मीच जाणिली
तव प्रीतीची रीत ?)

२

तव हृदयाच्या भूमीवर मी
होऊनि आलों रात,
विस्तृत अंबर, 'नील-कमल'सम
निरभ्र अन् निर्वात !
परि ताऱ्यांच्या उजळनांतर्गत-
तूं न जाणिली प्रीत
(किंवा नाही मी ओळखिली
तव प्रीतीची जात ?)

३

तव हृदयाच्या वनीं अता मी
झालों झंझावात—
त्यांतच लोपत इन्द्रधनूचे
चरण सुरंजित सात !
आता उरलें केवळ वावळ
काय शोधशी त्यांत ?
(किंवा आहे अशीच प्रीती—
चंचल मृगजळ-भ्रांत ?)

जगन्नाथ टंकसाळी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनलहरी

—१—

आशेच्या नगरीवर
अणुगोळे नशिबाचे
पडताक्षणि ढासळती
बुरुज इथे स्वप्नांचे
ध्येय-सापळे बघुनी
अर्धरात्र बघ सरते
गणिकेच्या पदरासम
जीवननिष्ठा ढळते !

—२—

अंधश्रद्धा माझ्यावरि
मोच इथे ठेवतसे
'मी'पण माझें येथे
प्राणाहुन जपत असें
दूर पळे यश येथे
निराश मन हळहळतें
नकळत श्रद्धा माझी
देऊळांत घुटमळते !

—३—

नवनवीन जीवन हें
विस्तरलें मजपुढती
नवनवीन आशा या
तान्यांसम लुकलुकती
नव आशा, नवीन ध्येय
स्वप्नांसह प्रगटलें
मी जुनाच असल्याने
कांही नाही कळलें !

—४—

प्रेमासाठी जगतों
आम्ही झिजतों, जगतों
प्रेमाचें गीत गात
आम्ही निघुनी जातों
दिवसरात्र शब्दाचें
वर्षांच्या ओळींचें
शतकांच्या कडव्यांचें
गाणें घुमतें अमुचें !

—योगेश्वर अभ्यंकर

अगतिक

जिथे भेटल्या आपुल्या वाटा
तिथेच पुढती विलग व्हायचें
कशास मग त्या अपेक्षितास्तव
वैफल्याचें गीत गायचें !—

म्हटलें आपण कितिकदा तरी
जेव्हा जेव्हा इथे भेटलों—
कदंबवृक्षाचीं खुडलेलीं
पुष्पें हुंगित आणि परतलों !

फिरून जमलों...पुन्हा परतलों...
दिवसा जमलों...जमलों रात्रीं...
कदंब होता सदा बहरला
फुलला होता गात्रीं गात्रीं !

...परंतु आता खरेंच जेव्हा
विलग इथे व्हायाचें आहे
कदंब अगतिक तोच येथला
अश्रुसुमें ढाळित बसलाहे !

रमेश वाबगांवकर

राहूं चालत असेच

नाही वुधाळ चांदणें
नाही रुपेरी आरास
नाही वायुलहरींत
आम्रमंजिरीचा वास !

आहे काजळली रात्र
गार बोचणारा वारा
घरें झोपलेलीं सारीं
काळा एकांत चावरा !

आणि अशा मध्यरातीं
शून्य पथीं तूं मी दोघें
शाल लपेटुन एक
बिलगून मुकेपणीं

राहूं चालत असेच...
राहूं चालत असेच !...

— मधु वाबगांवकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझें मीपण--!

डोळ्यांपुढती सदा तरळतो
तुझा हासरा मोहक चेहरा
स्मृतिसुमनांचा गंध दरवळे
अंगावर ये गोड शहारा

उगी उगी अन् भासच होतो
लवाड डोळे तुझे रोखले
कृष्णकमळिच्या वेलीवरचें
युग्म फुलांचें जणूं उमललें

हृदयांतील भाव चोरटे
गोंधळ माझ्या मनीं घालिती
शांत सतारीच्या तारांना
उगी छेडुनी झंकृत करिती

अशी कशी तव जादु प्रमदे!
स्वैर मनाला पडलें बंधन
कमलांच्या पाकळ्यांत दडले
भृंग होऊनी माझें मीपण

—सुरेश इनामदार

किती भावडी

हळूच चढली भावनेवरी
फुलावरील फुलराणी तूं
मंद मंद टाकीत पाउलें
मनांत नकळत शिरलिस तूं

पर्जन्याच्या पहिल्या सरींतुन
अंतर हळवे भिजवित तूं
पखरण करुनी मधुगंधाची
अंतरंगांत थरथरलिस तूं

अजाण इवल्या पाकोळीपरी
निळाईंत भिरभिरलीस तूं
नाजुक चंचल चिमणी होऊन
अंगणांत चिवचिवलिस तूं

उरीं लाजरी प्रीत घेउनि
स्वप्नांतुन विरहतेस तूं
परंतु त्याची न तुजला चाहुल
किती भावडी भोळी तूं !

—प्र. न. हवालदार

प्रेतांची भूमि

(कविवर्य अनिल यांची 'मेघांची भूमि' ही कविता वाचून)

प्रेतांची भूमि—
धुराच्या कुरळ्या वलयाखालती धगधगणारी ही
स्मशान-भूमि
नाचतात जेथे ठिणग्या भेसुर
उग्र स्थण्डिलाच्या उष्ण श्वासावर;
पिवळ्या ज्वालांच्या जिभल्याखाली
फिकट निळ्या अस्तराखाली
रक्त ओकलेली अंगारलाली
आणखी इकडे जरा बाहेर
काळ्या ठिपक्यांची मेलेली किनार...... !
भुऱ्या सर्पणांच्या छाताडावरती नाचणारी ही
पिवळी झालर
मिसळत मग वातावरणीं निश्वास कढत
निरपराध जीवांची आहुति वरून पडत...
मध्येच किंकाळ्या करुण इथे
थोड्याच वेळांत करपलीं शितें दिसतीं तिथे,
वाढत्या ज्वालांचे लाल पिवळे गोल कल्लोळ
शेवटीं ज्यांत भरीला पडतो राखेच्या भुग्याचा
ढीग विरळ!
वरून ओकतो पिवळ्या ज्वाला उद्दाम सूर्यही
वदाया मुखाने सत्यवचन मनाई तरीही !
अंतरंगांतील अनंत ऊर्मि--
भाजून जाळून टाकणारी ही अन्याय भूमि...
प्रेतांची भूमि.. !

प्रेतांची भूमि—
मळक्या दुनियेंत रक्त शोषणारी, विस्तारलेली
ही यंत्रांची भूमि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भव्य आकाराचे जाड लोखंडी, फुटीर खोल हीं दंतुर चक्रें
त्यांच्यामधून घुसडलेलीं दूरपर्यंत लोखंडी दांड्यांचीं लांबट अग्रें
दांड्यांच्या भोंवतीं चिवट पट्ट्यांची माळ घालून,
दुसऱ्या अजस्त्र चक्राभोंवतीं विळाख घाली कुणी ही नागीण
पडून डोळ्यांना भीतीचे सळ
येतसे भोंवळ......
येतसे तेथून डायनॅमोचा घर्रर आवाज कान ठोठावीत,
दोन पायांचीं दोन हातांचीं, असंख्य यंत्रें हात हलवीत !
हातापायांच्या झालेल्या काड्या,
खप्पड सुतकी चेहरे होऊन गेलेले वाया,
डोळे दडले हाडांच्या गड्डयांत
आणि आजन्म हाडांना चामडी चिकटून जात
भग्नपक्षाची अडली भरारी हिमालयाची
पावलें पडत कोलमडत धुळींत जायची
अशा या एकाच आकृतीमधून जाळून पोट मढी करायची,
पृथ्वीच्या गोलांत संपूर्ण यंत्रें रचूं पाहणाऱ्या, विश्वकर्म्याची ही लोहभूमि
प्रेतांची भूमि.........!

प्रेतांची भूमि—
आक्षितिज–व्याप्त चोहींकडून केवळ अंधार ओकओकणारी ही निराशाभूमि
मधून मधून काढिती डोकें हे आशांचे तारे
भूमीमधून निघती जशीं हीं पर्वतशिरें
असंख्य हे तारे बघती केव्हाचे डोकावूनियां क्षितिजाकडे
डोळ्यांत अपुल्या आणून प्राण;
आशापूर्तिचा सोनेरी बाण--
येईल केव्हा ? होईल केव्हा समाधान पोटें—भोळे भाबडे !
परी कुठे तरी लागतो सुरुंग
सारेच मनोरे होतात भंग !

अधीरतेनें चमचमून खळ्कन कोलीत फिरवीत येती अंधारावरून
—प्रचंड खडक शैलराजींचे येती खालती गडगडून !
तोच अखेर तेजाचा लोळ
आणि कायमचा पंख पसरून बसे अंधार हा जगड्व्याळ
वाट धुक्यांतून दिसे न पार
खरखरीत गोठवी अंग तुफान वारा वावरा गार
अंधाराच्या या भेसूर विकार अट्टहास्याचो, तांडव-नृत्याची ही विहारभूमि.
प्रेतांची भूमि......!

प्रेतांची भूमि---
वावळानंतर क्रूर शांततेची, सडल्या मढ्यांची किळसवाणी ही नरकभूमि
थंवेच्या थवे दिसती गिधाडें बसलेलीं की प्रेतें फाडीत
कुणी मांडीवर
कुणी छातीवर
कुणी गोंडस पुष्ट भुजेवर...!
ठिकठिकाणीं क्षतें पाडून आंतलें मांस मिटक्या मारीत
अर्ध्या फाडलेल्या प्रेतांमधून
कुणाची बाहेर बरगडी
कुणाची आंतडीं—कुणाचें यकृत, कुणाचें हृदय
त्यांतील गुलाबी खातात खाद्य लिबलिबित तोडतोडून
—झाडांचीं खोडें केलेलीं कुणी निष्पर्ण निर्जीव
कुणी येऊन फाडलीं प्रेतें तीक्ष्ण कुऱ्हाडीनें घालून घाव
अरेरे—
गिधाडांची खरी सुखविलासाची, ऐश्वर्यचैनीची ही स्वर्गभूमि
परंतु मानवी मृदु भावनांची, महदाकांक्षांची प्रत्यक्षांतली ही स्मशान भूमि...!
प्रेतांची भूमि...!

निशिकान्त करकरे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निळें आकाश

निळें आकाश
निळें पाणी
पूर्वेकडे बघ
सोन्याच्या खाणी !...

हरित तृणांची
मखमली धरणी
काळ्या शेतांत
सुरू पेरणी !...

पश्चिमेचे झाले
सलज्ज गाल
उजळ धरतिचें
विशाल भाळ !...

निळें आकाश
हेलावतें पाण्यांत
माझें हृदय तुझ्या
पापणीच्या जलांत !...

मेघांचे ससे
चंद्राच्या मागे
सलतात जणूं
रेशमांचे धागे !...

निळें आकाश
निळें पाणी
रजनी लुटते
चांदीची नाणीं !...

खुले आकाश
फुलराणी
चल मुक्त मनानें
गाऊं गाणीं !...

—विनायक पाठक

रात्र उरलीसे थोडी

रात्र उरलीसे थोडी
सोंगे रंगाध्वीं वहू
उजळतां वाही दिशा
खेळ आवरुनी घऊं

वाटे रात न सरावी
व्हावी पहाट ही आस
ओढाताण जीवघेणी
पडे संभ्रमाचा फास

कधी तोषवावें जना
कधी रिझवावें मना
मन मारून आणावीं
तींच तींच सोंगें पुन्हा

रोज तेंच तें आकाश
तोच नक्षत्रांचा थाट
तेंच तेंच पाहतांना
कधी येईच ना वीट

तशी माझी नित्यनवी
बहुरूपी जीवकळा
आसक्तीच्या मोहपाशीं
लुटे आनंद आगळा

विसरतों देहभान
क्षणमात्र सुखासाठी
नाही उसंत भोगाया
उकलता निरगाठी

घेतों सोंगें पुन्हा पुन्हा
याया जीवनांत गोडी
सारीं वाखवाया परी
रात्र उरलीसे थोडी

—गणेश पाठक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

दवबिंदू

(जाति-पांडव)

हा सडा कां चांदण्यांचा की हिमाचा भूवरीं
की फुलांची सेज केली घालण्या पृथ्वीवरी

की गळालें इंदुतूनी तेज कां हो ! भूतलीं
रंगली ही भू प्रभातीं ही झळाळी कोठली

मोतियांची वृष्टि कोणी कां कळेना केलि ही
की नभींची भूतलीं ह्या कोणि गंगा धाडिली

हासतां कां दंतपंक्ती भू प्रभातीं दाविते
रत्नमाला अप्सरांच्या ठेविल्या कोणी इथे

चंद्र साही ना वियोगा चंद्रिकेच्या जाणुनी
आसवें कां गाळिलीं हीं भू तयांनी नाहली

'हे दवाचे बिंदु बाळा' ऐशि वाणी ऐकिली
धन्य ईशा दिव्यतेची सन्मती ही कुंठली !

—दत्ताग्रज

ग्रीष्म

निर्जीव अचेतन सगळें अवकाशांत
अन् अस्तित्वाची नसे कुठे चाहूल.

ओकितो अग्निकण सविता व्योमांतून
निःशब्द धरित्री तडफडते दिनरात

निष्पर्ण वृक्ष हे थरथरती भीतीने
सुकुमार लतांचीं सुकून गेलीं पुष्पें

विस्तीर्ण जलाशय शुष्क मनार्मांवे झुरती
व्याकूल पांथ हिरमुसले वणवण फिरती

भटकतों आज मी छायेच्या शोधांत
पण हाय! चहुंकडे ग्रीष्माचें साम्राज्य !

—मनोहर वझे

सुगन्धी क्षण--

आज मला गवसला
माझा अमृताचा ठेवा
मर्त्य असूनही आज
झालों चिरंजीव देवा

काय स्वर्गाचें वैभव
असें याहून आगळें ?
माझें माझेंच असू दे
नको याहून वेगळें

माझ्या अपार भाग्याची
कशी घडली किमया
द्वैतांतील अद्वैताची
खूण पटली हृदया

साऱ्या विश्वांतील आज
साकारली मंगलता
मांगल्याच्या अन्तरींची
प्रकटली सुन्दरता

अवचित संजीवक
होतां सिंचन प्रीतीचें
क्षुद्र जीवनाचे क्षण
झाले सुगन्धी सोन्याचे

--माधव जामदार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानकोशकार

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

पां. वा. गाडगीळ

बरोबर अठरा वर्षांपूर्वी ता. १० एप्रिल १९३७ रोजीं ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा देहांत झाला. त्या दिवशीं महाराष्ट्र एका महापुरुषाला मुकला. त्या दिवशीं महाराष्ट्र एका व्यासंगी समाजशास्त्रज्ञाला, एका श्रेष्ठ संशोधकाला, एका थोर कर्मयोग्याला, एका क्रांतदर्शी महापंडिताला कायमचा अंतरला. त्या दिवशीं अनंतहस्तें ज्ञानधन वाटून देणाऱ्या ज्ञानी पुरुषास महाराष्ट्र आचवला. परंतु ही जाणीव त्या दिवशीं महाराष्ट्रांतल्या समाजधुरीणांना झाली नाही आणि आज दोन दशकांनंतर सुद्धा ती झाल्याची दिसत नाही. एरवी ज्ञानकोशकारांचें नांव विस्मृतींत जमा झालें नसतें. आजसुद्धा ता. १० एप्रिल ही ज्ञानकोशकारांची श्राद्धतिथि आहे हें आमच्या वाचकांपैकी किती जणांस माहित असेल याची कल्पनाच केलेली बरी. ज्ञानकोशकारांची उपेक्षा कां झाली ! ज्ञानकोशकारांच्या अगाढव्य कार्याची हेळणा कां झाली ! त्यांच्या अनेकविध कार्याची व मौलिक संशोधनाची पारख कां झाली नाही !

याचें उत्तर सरळ आहे. महाराष्ट्राला ज्ञानकोशकारांची स्वतंत्र प्रज्ञा कधीच कळली नाही. त्यांच्या संशोधनाचें मूल्य कधीच आकळिलें नाही. त्यांच्या ललित लेखनांत समाविष्ट झालेल्या सामाजिक समस्यांचें रहस्य कधीच उलगडलें नाही. त्यांच्या समाजशास्त्रीय लेखनाचें माहात्म्य केव्हांच पटलें नाही. एक 'विक्षिप्त विद्वान्' या व अभिधानानें त्यांची ओळख महाराष्ट्राला झाली होती. त्यांचे ज्ञानकोशांतील लेख, वैदिक संशोधन, हिंदुस्थानांतील जातींच्या संबंधाचें त्यांचे मूलगामी विवेचन, अनेक समाजशास्त्रीय प्रश्नांसंबंधांचे त्यांचे नवीन, स्वतंत्र व निर्भीड विचार यांचा अभ्यास करण्याचें आमच्या मनांतच येत नाही. आमच्या ढिल्या मेंदूला पचेल असेंच वाङ्मय आम्ही वाचतों. समाजशास्त्र, वंशशास्त्र, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांसारखे जड विषय आमच्या अशक्त बुद्धीला सोसवत नाहीत. आणि मग अशा विषयांचा दृढ परिश्रमानें अभ्यास करणाऱ्या प्रसिद्धिविमुख विद्वानांची आम्हांस ओळख पटत नाही. अशा विचारवंतांनी आपल्या व्यासंगानें व स्वतंत्र प्रज्ञेनें किती मूल्यवान् संशोधन केलें आहे व आमच्या राजकीय, व सामाजिक व तात्त्विक विचारांत किती भर घातली आहे, याची पूसतपास करण्याची आम्हाला गरज वाटत नाही.

आज महाराष्ट्रांत विद्याव्यासंगाची फारशी बूज राखली जात नाही. त्यामुळेच आमच्याकडे प. कृ. गोडे, प. ल. वैद्य, वा. वि. मिराशी काय संशोधन करीत आहेत, अगर आपल्या विषयांत काय विचार प्रतिपादन करीत आहेत याची माहिती करून घेण्याची आम्हांस इच्छाच होत नाही. एखादा पां वा. काणे धर्म व धर्मशास्त्र यांचा सखोल अभ्यास करून धर्मकोश रचतो; पण त्याचे अभ्यासू वाचक किती ! एखादा डॉ. आळतेकर हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास व

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संस्कृति या विषयावर मूल्यवान् लेखन करतो पण त्या लेखांचे जिज्ञासू विद्यार्थी किती ! एखादा डॉ. घुर्ये, एखादी डॉ. इरावती कर्वे, समाजशास्त्रावर लेखन करीत असत, पण अशा विषयांचे अभ्यासक प्रायः विरळाच. कलेच्या क्षेत्रांत मात्र अनाठायीं गर्दी झालेली आहे. बालिश ध्येयवादाने मढविलेल्या कथा लिहिणारे कथाकार व कादंबरीकार, पोकळ साम्यवादी घोषणांचें 'भक्तिकाव्य' लिहिणारे उथळ कवि, क्रमिक पुस्तकांवरच्या नोटसच्या पद्धतीने टीकाग्रंथ लिहिणारे मराठीचे प्राध्यापक, 'वेघडीकी मौज' म्हणून मनोरंजक नाटुकलीं लिहिणारे नाटककार, फुटकळ संशोधन करणारे, पोथ्यांची सटीक आवृत्ति काढणारे तथाकथित संशोधक व संकलनकार, यांचेच नांव आज महाराष्ट्रांत गाजत आहे. आज महाराष्ट्रांत याच लेखणीबहाद्दरांचें प्रस्थ माजलें आहे. आणि हेच लोक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चळवळीचे म्होरके बनलेले आहेत. अशा समाजाला डॉ. केतकरांच्या मूलगामी संशोधनाचें व मौलिक विचारांचें विस्मरण झालें तर त्यांत नवल काय !

ज्ञानकोशाच्या रचनेपूर्वीचा महाराष्ट्र-समाज जसा होता तसाच आज निद्रितावस्थेत आहे. या सुस्त समाजाला जागृत करण्याकरिता व 'महाराष्ट्राचें बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्याकरिता' ज्ञानकोशरचनेचें कार्य डॉ. केतकरांनी सुरू केलें. 'राष्ट्रसंघटनेस व राष्ट्रबलसंवर्धनास उपयोगी पडेल' असा ज्ञानकोश त्यांनी रचला. ज्ञानकोशाचे तेवीस भाग प्रसिद्ध केले. त्यांत आलेल्या डॉक्टरांच्या लेखनाचें संक्षिप्त समालोचन येथे करणें अशक्य आहे. जिज्ञासूंनी 'हिंदुस्थान आणि जग', 'वेदविद्या' हे विभाग, सर्व ग्रंथाच्या प्रस्तावना, वाङ्मयसूचीला जोडलेली प्रस्तावना, 'महाराष्ट्रीय महत्त्वाकांक्षा आणि तन्मूलक कर्तव्यें' 'महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण' हे लेख व 'इतिकर्तव्यता' हें प्रकरण अवश्य वाचावें. डॉक्टर केतकरांची उत्कट राष्ट्रीय वृत्ति अभ्यासकांच्या प्रत्ययास येईल. भांडारकरांपेक्षा कांकणभर सरस असें मूल्यवान संशोधन डॉक्टरांनी केलें आहे असें जाणत्या विद्वानाचें मत आहे डॉक्टरांच्या कादंबऱ्यांत अनेक सामाजिक प्रश्नांचें उद्घाटन केलेलें आहे. या सर्व कादंबऱ्या म्हणजे अनेक सामाजिक प्रश्नांवरील विचारांच्या खाणी आहेत. त्यांत मोठ्या व्यापक पार्श्वभूमीवर समाजांतील अनेक व्यक्तींचीं चित्रें रेखाटलीं आहेत. त्यांतील विश्लेषण मूलगामी आहे. मराठी वाङ्मयांत त्यांच्या कादंबऱ्यांचें स्थान स्वतंत्र आहे.

अशा या प्रतिभाशाली व्यक्तीचें महाराष्ट्राने काय स्मारक केलें ! महाराष्ट्राचा गाढ अभिमान बाळगणाऱ्या व मायभाषेच्या संवर्धनासाठी अहोरात्र तळमळणाऱ्या या विद्यासेवकाची विस्मृति महाराष्ट्राला कां व्हावी ? विचारजडाने आपली मराठी मायभाषा फुलविणाऱ्या या साहित्यश्रेष्ठाचें विस्मरण महाराष्ट्रास कां व्हावें ? कोणा कवीच्या नांवाने सभागृह बांधलें जातें. दुसऱ्या एका कादंबरीकाराच्या नांवाने व्याख्यानमाला चालते, तर तिसऱ्या एका नाटककाराच्या स्मृतीदाखल नाट्यगृह बांधण्याची योजना आखली जाते. पण महाराष्ट्राच्या या प्रकांड पंडिताचें स्मारक करण्यासाठी कोणीहि समाजनेता पुढे येतांना दिसत नाही. त्याच्या स्मृतीचें चीज करण्याकरिता एखादी समाजशास्त्राची पाठशाला स्थापन करण्यासाठी अगर त्याच्या अप्रकाशित ग्रंथांचें प्रकाशन करण्यासाठी कोणताहि साहित्यसंघ अगर परिषद पुढे येत नाही, ही मोठी शोचनीय अवस्था आहे. या थोर विचारवंताच्या स्मारकाची अनास्था हा महाराष्ट्राला लागलेला काळिमा आहे आणि जोंपर्यंत ज्ञानकोशकारांचें स्मारक होत नाही तोंपर्यंत तो पुसला जाणार नाही. डॉक्टर केतकरांची उपेक्षा कां झाली याचीं आम्हास दोन कारणें दिसतात. एकतर त्यांच्या श्रेष्ठ व्यक्तिमत्वाचें आकलन आम्हांस झालें नाही; आणि दुसरें त्यांच्या कार्याची महात्मता आम्हांस पटली नाही. त्यांनी एका ठिकाणीं म्हटलें आहे की, 'मी जें काय लिहिलें त्याची उत्तम जाणीव होण्याइतका ज्ञानविकास भोवतालच्या जनतेंत नाही.'

आणि हें खरें असल्यामुळेच 'त्यांच्या संशोधनाची पारख समकालीन महाराष्ट्राकडून झाली नाही' आणि दुसरें असें की, त्यांच्या मागें चाहत्यांचा व अभिमान्यांचा जबर वर्ग नव्हता. त्यांनी शिष्यवर्ग तयार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केला नाही अगर उपग्रहांचें लटांवर गोळा केलें नाही. कोणाचे अनुचर बनले नाहीत की कोणाला आपले अनुचर बनविलें नाही. कोणत्याहि साहित्य-संस्थानिकाची अगर संपादकशौंडाची त्यांनी पर्वा केली नाही. सार्वजनिक संस्थाची चिटणिशी करून आपली कीर्ति वाढविली नाही. वर्तमानपत्राच्या आधारांत राहून त्यांनी आपली प्रसिद्धि करून घेतली नाही. पुण्यांत राहूनच त्यांनी पुण्याच्या प्रतिगामीपणावर, सदाशिवपेठी संकुचित मनोवृत्तीवर, राजकीय व सामाजिक मागासलेपणावर व पोशाखी सुधारणेवर कठोर प्रहार केले. आणि पुण्याच्या साहित्याचार्यांचा, निष्क्रिय, भंपक पुढाऱ्यांचा व त्यांच्या भगतगणांचा रोष ओढवून घेतला. या लोकांनी त्यांच्या हयातींत त्यांची मानखंडना तर केलीच, परंतु त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांना आपल्या वैराचा विसर पडला नाही. हे लोक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चळवळीचे पुढारी होते आणि त्याच गोत्राचे लोक आजहि हयात आहेत. डॉक्टरांचें स्मारक न होण्याचें कारण की, आजचे वाङ्मयीन चळवळीचे पुढारी त्याच कोत्या मनोवृत्तीच्या लोकांचे शिष्यप्रशिष्य आहेत. डॉ. केतकरांच्या अखेरच्या दिवसांतील आर्थिक आपत्तींचें वर्णन वाचलें म्हणजे कोणाचेंहि हृदय पिळवटून निघेल. चित्रकार नी. म. केळकरांनी त्यांच्या ओढगस्त परिस्थितीसंबंधीची दिलेली आठवण वाचून कोणाहि भावनाशील माणसाच्या डोळ्याला पाणी येईल. 'प्राचीन महाराष्ट्रा'चे इतर खंड त्यांना प्रसिद्ध करावयाचे होते व त्यासाठी ग्राहक करण्यास ते वणवण भटकत असत. आर्थिक आपत्तीशीं झगडत ते आपलें आयुष्य कंठीत होते परंतु त्यांचें ज्ञानार्जन व ज्ञानदान कधीच थांबलें नाही. अशा धीरोदात्त पुरुषाच्या मृत्यूने आमची केवढी अपरिमित हानि झाली आहे याचें स्पष्ट स्वरूप आम्हाला तेंव्हा समजलें नाही, आणि त्या थोर विचारवंताची उपेक्षा केल्याचें पाप माथ्यावर घेऊन बसलों. त्या पापाचें परिमार्जन त्यांचें यथोचित स्मारक केलें तरच होईल. तसेंच त्यांच्या अप्रकाशित ग्रंथांचें प्रकाशन करण्यासाठी त्यांच्या पत्नीस आवश्यक तें आर्थिक साहाय्य करून त्यांचें महान् ऋण फेडल्यासारखें होईल.

आज डॉक्टरांचें समग्र चरित्र उपलब्ध नाही. तसें पाहिलें तर डॉक्टरांचें संबंध आयुष्यच मुळी अनेक मनोवेधक आठवणींनी गुंफिलेलें आहे. त्यांचें बालपण व विद्यालयीन जीवन, अमेरिका व इंग्लंडमधील विद्याव्यासंग आणि ग्रंथरचना, हिंदुस्थानांतील आगमन आणि देशाचें परिभ्रमण, व ज्ञानकोश मंडळाचें कार्य हीं त्यांच्या जीवनांतील प्रकरणें अत्यंत रम्य व उद्बोधक आहेत. डॉक्टरांचें जीवन व व्यक्तिमत्व रेखाटण्यास त्यांच्या प्रतिभेचा व कार्यशक्तीचा परिचय असलेला चरित्रकार पाहिजे. डॉक्टरांसारखा महापंडित जर युरोपमध्ये जन्मला असता तर एखादा एमिल लडविग् त्यांच्या जीवनाचें रहस्य सांगण्यास पुढे येता. फार कशाला डॉक्टर बंगाल्यांत जन्मले असते तर त्यांच्या कर्तृत्वशक्तीचें कौतुक झालें असतें. त्यांच्या जीवनावर अनेक चरित्रें व परिचयात्मक लेख प्रसिद्ध झाले असते. सार्वजनिक संस्थांतून त्यांचीं तैलचित्रें लागलीं असतीं. कारण स्वसमाजांतील थोर विद्वानांचा व कर्मयोगी पुरुषांचा आदर कसा करावा हें बंगाली गृहस्थास आमच्यापेक्षा जास्त उत्तम तऱ्हेने कळतें. महाराष्ट्रांतील लोकांना आपल्या नेत्यांना कसें वागवावें हें कळत नाही. आमच्यामध्ये मनाचा कोतेपणा, क्षुद्रपणा इतका भरला आहे की कोणच्याहि थोर व्यक्तींचा आदरसत्कार करणें आम्हांला दुरापास्त झालें आहे. निकटवर्तित्वामुळें आमच्यांत वावरणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांची वा गाढ्या विद्वानांची थोरवी आम्हांस कळत नाही. परप्रांतांतील दुय्यम श्रेणीच्या व्यक्तींचीं चरित्रें आम्ही लिहून प्रसिद्ध करतों; परंतु आमच्यामध्ये असलेल्या युगप्रवर्तक साहित्यकाराचें व पंडिताचें समग्र चरित्र लिहिण्यासाठी कोणीहि ग्रंथकार पुढें येत नाही. डॉ. केतकरांच्या सान्निध्यांत कितीतरी विद्वान आले असतील, कित्येकांना तर त्यांनी च लेखक बनविलें असेल. कित्येक तरुण साहित्यिकांना त्यांनी मार्गदर्शन केलें असेल पण त्यांच्यापैकी कोणीहि त्यांच्या विस्तृत चरित्राचें लेखनकार्य अंगिकारण्यास पुढे येतांना दिसत नाही. ज्ञानकोशरचनेसारखा अवाढव्य उद्योग व अलौकिक ग्रंथरचना करून मराठी

साहित्याचें महत्त्व व वजन वाढविणाऱ्या या प्रचंडप्रज्ञ पुरुषाचें समग्र चरित्र आज मराठी भाषेंत उपलब्ध असूं नये ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ज्यानें आपल्या मायभाषेच्या सेवेसाठी संपत्तीची कदर केली नाही, सुखाधीन आयुष्याची इच्छा बाळगली नाही, अगर मानसन्मानाची वांछा केली नाही, अशा महान् पुरुषाच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचें दर्शन सामान्यजनास करून देण्याकरितां कोणांहि महाराष्ट्रभाषा-सेवकाने त्यांच्या चरित्रलेखनाचें कार्य सुरू केल्यास तो सदैव धन्यवादास प्राप्त होईल.

खरें पाहिलें असतां डॉक्टरांच्या ज्ञानकोशमंडळांत बारा वर्षे घालविलेल्या व अधिक वर्षे त्यांच्या दैनंदिन सान्निध्यांत असलेल्या शब्दकोशकारांनी हें कार्य अंगिकारावयास पाहिजे होतें; परंतु या शब्दकोशसंपादकांनी 'डॉ. केतकरांच्या सान्निध्यांत' या नांवाचें एक चोपडें प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील लेखमुद्रा अत्यंत सहानुभूतिशून्य वृत्तीने लिहिलेले आहेत. डॉक्टरांच्या भावी चरित्रकाराला डॉक्टरांचे बालपणचे स्नेही डॉ. य. खु. देशपांडे, वीर वामनराव जोशी, श्री. बा. सं. गडकरी यांच्या संस्मरणांचा उपयोग करून घेता येईल. डॉक्टरांच्या अनेक व्यक्तिगुणांचें दर्शन करून देणाऱ्या त्यांच्या आठवणी त्यांच्या भावी चरित्रकाराला फार उपयुक्त होतील. चरित्रकार मात्र कुशल कलावंत पाहिजे. स्वतः डॉक्टरांनी ठिकठिकाणीं स्वतःसंबंधी लिहून ठेवलें आहे, त्याचा कलात्मक उपयोग कुशल चरित्रलेखकाला करून घेतां येईल. डॉक्टरांच्या जीवनपटांत अनेक असामान्य उद्योग आहेत, अद्भुतरम्य घटना आहेत, आकर्षक भव्यता आहे, स्वभावांत उत्कटता व अपूर्व त्याग आहे, स्वभाषेच्या संवर्धनाकरिता अनेक संकल्पांची पूर्तता आहे व थोर मनाचा साक्षात्कार आहे. अशा असामान्य व्यक्तीचें समग्र चरित्र मराठींत जो कोणी लिहून काढेल तो महाराष्ट्र जनतेच्या धन्यवादास पात्र होईल. डॉक्टर केतकरांसारख्या आदरणीय व्यक्तीचें चरित्र, त्यांची स्मृति कायम ठेवण्याकरिता व त्यांच्या थोर कार्याचा गौरव करण्याकरिता, पुढील पिढीसाठी आदर्श म्हणून ठेवण्यासाठीं, लिहावयाचें असतें.

ज्ञानकोशकारांच्या या अठराव्या स्मृतिदिनीं त्यांच्या स्मारकासंबंधीच्या कार्याला चालना मिळावी, त्यांच्या समग्र चरित्राचें लेखन सुरू व्हावें, व त्यांच्या विद्याव्यासंगाचें अनुकरण मराठी भाषाप्रेमी तरुणांनी करावें म्हणून ह्या लेखाचा खटाटोप आम्ही केलेला आहे. डॉ. केतकरांचा एक विनम्र अभिमानी म्हणून प्रस्तुत लेखकाने हा लेख लिहिलेला आहे. यापेक्षा दुसरा कोणताहि हेतु ह्या लेखाचा प्रेरक झालेला नाही. डॉक्टरांच्या अप्रकाशित ग्रंथांच्या प्रकाशनासाठी कोणत्याहि साहित्यसंघाने अगर परिषदेने निधी उभा केल्यास व त्यांचें यथोचित स्मारक केल्यास त्या कार्यकर्त्यांवर जागृत महाराष्ट्राकडून स्तुतिसुमनांचा वर्षाव होईल व त्यामध्ये ओंजळभर तरी फुलें प्रस्तुत लेखकाचीं निश्चितपणें असतील.

श्री. ना. पेंडसे यांचें अभिनंदन

सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार श्री. श्री. ना. पेंडसे यांना रॉकफेलर फाऊंडेशनची प्रवासी शिष्यवृत्ति मिळाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे त्यांना युरप-अमेरिकेंत वर्षभर प्रवास करण्याची संधि मिळेल. हा केवळ श्री. पेंडसे यांचा अगर त्यांच्या ललितलेखनाचा गौरव नसून मराठी साहित्याचाहि गौरव आहे. श्री. पेंडसे यांचें 'युगवाणी' मासिकाच्या संपादकमंडळातर्फे, व विदर्भ साहित्य संघाच्या सदस्यांतर्फे आम्ही हार्दिक अभिनंदन करतों.

—संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वारकऱ्यांच्या पंजाबांतील वसाहती' आणि 'पंजाबांतील नामदेव'

रा. ना. घाटोळे

संत नामदेव ह्यांचा काल, त्यांचें चरित्र व वाङ्मय ह्याबाबत आजपर्यंत अनेक प्रकारचे वाद उपस्थित झाले; व ह्या वादंगांत अनेक पंडितांनी भाग घेतला. परंतु प्रस्तुत लेखांत ह्या सर्व वादग्रस्त मुद्यांचा विचार करावयाचा नसून केवळ त्यांचें पंजाबांतील वास्तव्य व त्यांच्या नांवावर मोडली जाणारी त्यांची शिखांच्या 'ग्रंथ साहेबांतील' हिंदी पद्यरचना ह्या विषयींचा विचार करावयाचा आहे. इतर वादग्रस्त मुद्यांचा पुढे यथावकाश परामर्श घेऊंच.

परप्रांतांत वसाहत करून संतकार्याचा प्रसार करणारे नामदेव हेच पहिले (आणि जवळ जवळ शेवटचे) संत होत असा आज सर्वसंमत विचार आहे. संत वाङ्मयावर लिहिणाऱ्या सर्व थोर व विद्वान लेखकांनी हा विचार गृहित धरूनच आपलें लेखन केलेलें आहे. ह्या मताचा जोरदार पुरस्कार विशेषतः पांडुरंग शर्मा व शं. पु. जोशी ह्यांनी केला आहे. श्री. जोशी ह्यांनी 'पंजाबांतील नामदेव' म्हणून स्वतंत्र पुस्तक लिहलें आहे. त्यांचे परिश्रम खरोखरच प्रशंसनीय आहेत. ह्या पुस्तकांत नामदेवांचें एक गळयांत जानवें असलेलें व दाढीमिशा वाढलेलें चित्र आहे.

जन्मकालाची व्यर्थ ओढाताण

श्री. जोशी ह्यांनी आपल्या ह्या पुस्तकांत शके ११८५ हा त्यांचा जन्मशक मानून केलेली एक कुंडलीहि दिलेली आहे. हा जन्मकाल वारकरी समजुतीशीं विसंगत आहे. नामदेवांच्या अभंगांत "अधिक व्याणव गणित अकरा शते। उगवता आदित्य रोहिणीशीं॥ शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार। प्रभव संवत्सर शालिवाहन शके॥ (आवटे प्रत १२५४) असा स्पष्ट उल्लेख आहे. ह्यांत शक आणि संवत्सर ह्यांचा मेळ जुळत नाही म्हणून दोन पैकी कांही तरी एक चुकीचें आहे. शालिवाहन शके ११९२ ला प्रभव संवत्सर येत नसून प्रमोद संवत्सर येतो म्हणून भांडारकर, भारद्वाज आदि लेखकांना हा अभंग प्रक्षिप्त मानावा लागला. श्री. भारद्वाज ह्यांनी तर 'अधिक व्याणव गणित अकरा शतें' हा मूळ पाठ सोडून देऊन "अधिक ते नवगणित तेरा शतें" असा आपल्या डोक्यांतून काढलेला पाठ घालून कालदृष्टया शंभर वर्षांची लांब झेप घेतली. पण लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की शके १३०९ ला कार्तिक शुद्ध ११ स रविवार येत नाही. उलट संवत्सराचें नांव जरी जुळत नसलें तरी ११९२ सालीं कार्तिक शुद्ध रविवार येतो व एकादशीहि येते. श्री. भिंगारकरांनी केसरींत लेख लिहून ह्याच आधारावर भारद्वाजांचें म्हणणें खोडून काढलें आणि आम्हालाही तेंच बरोबर वाटतें. आमच्या मतें अभंग बरोबर असून संवत्सराचें नांव चुकीचें असण्याचा संभव आहे. कोणत्याहि व्यक्तीला आपलें वय बहुधा बिनचूक ठाऊक असतें, त्यामुळे शकाच्या बाबतींत चूक होण्याचा संभव फारच कमी; तशी गोष्ट संवत्सराची नाही. ती गोष्ट केवळ ज्योतिर्विषयक आहे. त्यामुळे आयुष्यांतील उत्तरार्धांत आपल्या पत्रिकेचें वर्णन करीत असतां त्याच्या नांवांत चूक होण्याचा संभव आहे. प्रभव आणि प्रमोद ह्या दोन्ही शब्दांत 'प्र' हें आद्याक्षर सामान्य असल्यामुळे तशी चूक घडून येणें अगदी सहज आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बावाजी ब्राम्हणाने जरी पत्रिका लिहून ठेवलेली असली तरी नामदेवासारख्या उदास होऊन घरादारावर तुळशीपत्र ठेवणाऱ्या सद्‌गृहस्थाजवळ ती शिल्लक असेलच आणि ती पाहूनच त्यांनी आपला अभंग लिहला असेल असें मानणें कठीण आहे. स्वत: श्री. जोशी ह्यांनी इ. स. १२७० हाच जन्मकाळ प्रमाण मानलेला आहे. (पृ. १७ पंजाबांतील नामदेव) "एकंदर गोष्टींचा विचार केल्यावर संत नामदेव हे कबीरापूर्वीच होऊन गेले होते असें कबीराच्या काव्यांतील कित्येक उद्‌गारांवरून सिद्ध होतें." असेंहि ते म्हणतात. नामदेवांच्या उत्तरेकडील चरित्रासंबंधी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही की, त्यांची सारी भिस्त नाभाजीची "भक्तमाला", ग्रंथसाहेबांतील पद्यें, उत्तरेकडील कांही दंतकथा आणि त्यांच्याच साह्याने इ. स. १८९८ मध्ये पूरणदासांनी गुरुमुखींत केलेल्या "जन्मसाखी श्री नामदेवजी" या काव्यग्रंथावर आणि घोमान येथील नामदेव मंदिरावर आहे.

उत्तरेकडील नामदेव व महाराष्ट्रीय नामदेव ह्यांच्यांतील कालविसंगति

प्रत्यक्ष उत्तरेकडील संतवाङ्‌मयाचा अभ्यास करणाऱ्या पंडितांकडे पाहावें तर नामदेवाचे जन्म व समाधि शक, तसेंच जन्माची व समाधीची स्थिति इ० गोष्टींत व महाराष्ट्रीय समजुतींत पराकाष्ठेची विसंगति आहे. हा कालभेदाचा मुद्दा एवढा प्रबळ आहे की त्याचा परिहार करण्याकरितां इ. स. १८९८-९९ मध्ये 'सुधारक' पत्रांत लेख लिहून नामदेवाचा काल सुमारें एक शतक पुढे ढकलण्याचा मोह झाला. उत्तरेकडील तीन लेखकांनी संत नामदेवांचीं चरित्रें लिहलीं आहेत. त्यापैकी बाबा भगतराम ह्यांनी लिहिलेल्या इंग्रजी पुस्तिकेंत नामदेवाचा जन्म शके इ. स. १३७० गृहीत धरलेला आहे. दुसरे लेखक श्री. बन्सीधर शास्त्री ह्यांनी एक 'श्री. स्वामी नामदेव' नांवाचें इंग्रजी चोपडें प्रसिद्ध केल्याचें श्री. जोशी लिहतात. त्यांनी नामदेवाचा जन्म शक इ. स. १६६३ व मृत्युशक १४६४ असल्याचें प्रतिपादन केलें आहे व ते घोमान येथेच मृत्यु पावले असेंहि ते म्हणतात. तिसरे लेखक बाबा पूरणदास होय. यांनी स. १८९८ मध्यें गुरुमुखी भाषेंत 'जन्मसाखी श्री. नामदेव' नांवाचें पुस्तक लिहिलें. त्यांत त्यांनी संवत १४२० सन १३६३ हा जन्म शक गृहित धरला आहे. तात्पर्य एवढेंच की उत्तरेकडील समजूत व महाराष्ट्रीय समजूत ह्यांत फार मोठें अंतर आहे. पंडित पांडुरंग शर्मा ह्यांनी ह्या विसंगतीचा परिहार करण्याची मोठी खटपट केली आहे. तिच्या विषयीं जास्त कांही लिहिण्याचें कारण नाही. अध्यात्म संदेशाची व भजन साक्षात्काराची निरनिराळी तिथि साजरी करण्याचा वारकऱ्यांत संप्रदाय आहे किंवा काय हें आम्हाला माहित नाही. विरक्त झालेले वारकरी आपल्या जन्मतिथीला महत्व देत नसतील हीहि गोष्ट मान्य होण्यासारखी आहे; तथापि मुख्य गोष्ट ही आहे की नामदेवांनी आपली प्रत्यक्ष जन्मतिथि लक्षांत ठेवली आहे. तेव्हा 'जन्मसाखी' सारख्या एखाद्या पांचसहाशें वर्षांनी मागाहून लिहलेल्या ग्रंथांतील विधान प्रमाण मानावयाचें व प्रत्यक्ष नामदेवाचें वचन अप्रमाण मानावयाचें की काय ? पंडित पांडुरंग शर्मा ह्यांनी आपल्या लेखांत इतर ज्या कांही गोष्टी दिल्या आहेत त्या साऱ्या प्रमाण धरल्या तरी त्या घडण्यास आणि जोशी ह्यांनी आपल्या पुस्तकांत दिल्याप्रमाणें पंजाबांत एखाद्या वारकरी संप्रदाय प्रस्थापित करणारा किंवा एखाद्या नामदेवाची मूर्ति तिथे असण्यास प्रत्यक्ष नामदेव तिथे गेले पाहिजे असें नाही नामदेवाचा एखादा निस्सीम भक्तहि तें करूं शकतो. इतकेंच नाही तर त्याचें नांवहि नामदेव असूं शकतें. अथवा पंजाबासारख्या अतिदूर प्रांतांत भक्तांच्या निस्सीम गुरुभक्तीमुळे गुरूचेंच नांव भक्ताला चिकटलें जाणें ही गोष्ट असंभवनीय खास नाही.

वसाहतीची भ्रामक व आधारशून्य कल्पना

नामदेवांच्या पंजाबांतील वस्तीची कल्पना महाराष्ट्रीयांना आवडण्याचें मुख्य कारण असें की तिला दिलेलें परप्रांतातील वसाहतीचें स्वरूप. 'परप्रांतांतील महाराष्ट्राच्या वसाहती' ही कल्पनाच मुळी रोचक व विलोभनीय आहे. कोणत्या महाराष्ट्रीय व्यक्तीला ती आवडणार नाही ? खरें पाहिलें तर इंग्रजांच्या सहवासाने व युरोपच्या इतिहासाच्या परिचयानें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वसाहत म्हटली की ज्या कल्पना आपल्या डोक्यांत शिरतात त्या प्राचीनकाळीं प्रत्यक्ष पाश्चात्यांच्याहि डोक्यांत नव्हता. पंडित पांडुरंग शर्मा ह्यांनी तर "वारकऱ्याच्या वसाहती" ह्या आपल्या लेखांत असेंहि दाखविण्याचा प्रयत्न केला आहे की ज्ञानेश्वरापासून तों तहत पेशवाईपर्यंत ही एक सुसंघटित चळवळच झाली होती. (भारतीय इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिकांतील लेख; वर्ष ६, अंक १, २, ३, ४) ज्याप्रमाणे इंग्रज लोक प्रथमतः कोठेहि व्यापाराकरिता वखार घालीत व पुढे त्यास व्यापक स्वरूप देऊन त्या भूमीचें आक्रमण करीत असत, तसाच प्रकार हाहि होता असें त्यांचें म्हणणें आहे. "जेथें जेथें आपली मांड नीट बसण्यासारखी अनुकूल परिस्थिति त्यांस दिसून येई, तेथें तेथें ते भागवत धर्माचें बीज पेरून एका लहानशा वसाहतीचा पाया घालीत. त्या पायाचीं रोपटीं, रोपट्यांचे पुढे विस्तीर्ण वृक्ष, वरेच झाल्याचें ह्या हिंदुधर्मांत ठिकाठिकाणीं दिसून येतें. (सदर अंक पृ. ४) प्रत्यक्ष इतिहासाच्या कसोटीवर घासून ह्या विधानाची किंमत पाहणें आवश्यक आहे; पण त्यासंबंधी विचार न करतां येवढेंच म्हणतां येईल की इतिहासाची साक्ष ह्याच्या अगदी उलट आहे. क्वचित् कोठे वारकऱ्यांची वस्ती अन्य प्रांतांत घडली नसेल असें नाही, पण ती एक सुसंघटित चळवळ होती असें मानण्यास कांहीहि पुरावा नाही, आणि तसें असल्यास त्या हेतूची परिपूर्णता महाराष्ट्राशिवाय इतर कोठे झाल्याची अथवा शिवाजी महाराजांचा काळ सोडला तर ह्या वसाहतींचा महाराष्ट्राला कांही लाभ झाल्याची मुळीच साक्ष नाही. रामेश्वर, पशुपतीश्वर इत्यादि क्षेत्रांच्या महाराष्ट्रीय ब्राह्मण पुजाऱ्यांचा त्यांनी हवाला दिला आहे. परंतु हे पुजारी संतांच्या चळवळीचा अवश्य परिणाम म्हणून तेथे गेले नसून पेशव्यांच्या राजकीय धोरणाचा तो परिणाम होता. त्या पुजाऱ्यांच्या सनदा पाहिल्या तरी हें दिसून येईल.

यांच्या अस्तित्वाला त्यांच्या व समकालानांच्या अभंग-वाङ्मयांत आधार नाही

वस्तुतः अनुल्लेखाला पुराव्याच्या दृष्टीने फारच थोडी किंमत आहे व केवळ त्याच्याच बळावर एखादें विधान करणें हें तर्कशुद्धहि नाही. परंतु जेथे अनुल्लेखाला न्यायशास्त्रांतील अभावाचें स्वरूप येतें अथवा केवळ अनुल्लेखाच्याच बळावर दोन विधानें केलीं जातात तेथे तो अनुल्लेख बलवत्तर प्रमाण म्हणून उपयोगी पडतो. 'पंजाबांतील नामदेवाविषयी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. त्यांच्या प्रत्यक्ष अस्तित्वाला तत्कालीन तर काय पण पुष्कळ वर्षे मागाहून देखील कांहीच पुरावा नाही. ग्रंथसाहेबांतील नामदेवांचीं पद्यें फार झालें तर नानकाशीं नामदेवांचा कांही संबंध दाखवूं शकतील; पण त्यापासून नामदेवांची वस्ती सिद्ध होत नाही. ज्या ग्रंथसाहेबांत नामदेवांचीं समजलीं जाणारीं पद्यें आलीं आहेत तो ग्रंथसाहेब हा ग्रंथच मुळी शिखांचा पांचवा गुरु अर्जुनसिंह ह्यांनी आपल्या कारकीर्दींत संकलित केला. सन १५८१ ते १६०६ हा त्यांच्या कारकीर्दीचा काळ समजला जातो. दुसरी महत्वाची गोष्ट ही की, ग्रंथसाहेबाची गुरुमुखी भाषा व लिपी ही चौदाव्या व पंधराव्या शतकांत अस्तित्वांतहि नव्हती; आणि त्याहूनहि महत्वाची गोष्ट अशी की, श्री. जोशी ह्यांच्या मताप्रमाणे बहोरदास जाल्लो हे नामदेवांचे पट्टशिष्य म्हणविल्या जातात. अर्थात हे पट्टशिष्य नामदेवांनी आपल्या हयातींतच बनविले असतील हें सांगावयास नकोच. परंतु बहोरदासाचा जन्मकाल स. १४३० व मृत्यु स. १५२३ हें प्रसिद्धच आहे. म्हणजे दोघांच्या काळांत सुमारें १००-१५० वर्षांचें अंतर आहे. स्वतः इहलोक सोडून गेल्यानंतर श्री. नामदेव हे बहोरदासांना आपला शिष्य कसा बनविणार ? हें शक्य तरी आहे काय ! सारा कल्पनेचाच खेळ दिसतो असें म्हणावें लागतें.

आणखीहि एक मुद्दा विचारांत घेण्यासारखा आहे. नामदेवांनी पंजाबांत जाऊन आपलें उत्तर आयुष्य तेथे घालविणें आणि समाधिपुरतें मात्र पुन्हा पंढरपुरला येणें ही गोष्ट इतकी महत्वाची आहे की वारकरी संप्रदायांत त्याची आठवण बुजणें शक्य नाही. कारण तसे ते गेले असल्यास पंढरपुरचें माबदें आणि ज्ञानेश्वरादिकांच्या समाधि उरकूनच ते गेले असले पाहिजेत. नामदेवांची बहुतेक सर्व कविता ह्या काळानंतरची आहे हें सांगावयास नकोच; कारण त्यांच्या

मनांत वाल्मिकीप्रमाणे शतकोटी अभंगरचना करण्याची इच्छा उत्पन्न झाली, त्यांनी पांडुरंगाजवळ हट्ट धरला, एवढेंच नव्हे तर आपले गुरु श्री. विसोबा खेचर ह्यांची अनुज्ञा मागितली व त्यांनी ती दिली (नामा म्हणे मज स्वप्न दिलें हरी । प्रीतीनें खेचरी आज्ञा केली ॥ आवटे प्र. १४०६). अशी कबूली त्यांनी आपल्या अभंग-वाणींतून दिली आहे. आणि गोऱ्याकुंभाराने त्यांचा उपहास केल्यानंतरच ते विसोबा खेचराकडे गेले ही गोष्ट प्रसिद्धच आहे; म्हणजे ही घटना पंढरपूरचें मावंदें आणि ज्ञानेश्वराची समाधि ह्यांच्या मधल्या काळांत घडली आहे. हा 'जुनाट गोरा' म्हणजे वारकरी समाजतात त्याप्रमाणे 'गोरा कुंभार' की 'ज्ञानेश्वर-दर्शनां'त सरदार मिरीकर म्हणतात त्याप्रमाणे प्रत्यक्ष गोरखनाथ ह्या वादांत शिरण्याचें आपणास कांहीच कारण नाही. आपल्या विषयाच्या दृष्टीनें तो केवळ अप्रस्तुत आहे. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्या सहवासांत तीर्थ-यात्रेला जावयाचें म्हटलें तरी पांडुरंगाचा वियोग नामदेवाला सहन होईना आणि नामदेव दूर जाणार म्हणून पांडुरंग कासावीस होऊं लागणार, अशा स्थितींत नामदेवांनी या आपत्तींत स्वतःला पुन्हा आपणहून घालून घेतलें असेल हें असंभवनीय आहे. ज्ञानेश्वरांच्या आग्रहाखातर पांडुरंग कबूल होऊन, केवळ आपल्या आज्ञेच्या बळावरच त्यांनी नामदेवाला यात्रेला पिटाळून लावलें होतें, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. अशा रीतीनें पांडुरंगाच्या सहवासाकरता सदैव आतुर असलेले व पंढरपुरासच भूवैकुंठ मानणारे एकनिष्ठ वारकरी भक्त नामदेव आजकालच्या एखाद्या प्रचारकाचा आवेश अंगीं आणून वर्षानुवर्षे पंढरी सोडून पांडुरंगापासून दूर राहिले हें म्हणणेंच अवास्तव आहे. बरें कांही महत्वाच्या कामाकरिता हें वियोगदुःख सहन करून पांडुरंगानें त्यांना जाणूनच दूर केलें, असें म्हणावें तर तसें ईश्वरी कृत्य म्हणण्या जोगती कोणतीच कामगिरी नामदेवांनी पंजाबांत केल्याचें प्रसिद्ध नाही. श्री. मुंडी ह्यांनी आपल्या लेखांत कल्पना केल्याप्रमाणे (युगवाणी, वर्ष ६ अंक ७ 'नामदेवांची हिंदी कविता') मुसलमान धर्मान्या आक्रमणास तोंड देण्याकरता प्रतिकाराची यशस्वी चळवळ उभारण्यास नामदेव मुद्दाम पंजाबांत गेले असल्यास, त्यांना त्या दृष्टीनें कांहीच कार्य करतां आलें नाही असें म्हणावें लागतें; शिखांनी पुढे काय केलें असेल तें असो, परंतु ह्या लेखकाच्या मताप्रमाणे नामदेवाचा म्हणून जो सांप्रदाय तेथें आहे त्यांत राष्ट्रीय असें कांहीहि नाही; निःशस्त्रांचें प्रभावी राजकारण तर नाहीच नाही. स्वतः भजन पूजन करून भजनी मंडळीचा एक सांप्रदाय उत्पन्न करणें म्हणजे कांही भारतवर्षांत अलौकिक गोष्ट नाही. म्हणून प्रत्यक्ष नामदेव पंजाबांत पुन्हा गेले हें म्हणणें सुसंगत वाटत नाही. नामदेव हे वारकरी होते आणि आषाढीकार्तिकीची वारी हें तर वारकऱ्यांचें मुख्य व्रत ! (सांडुनी पंढरीची वारी । मोक्ष मागती ते भिकारी ॥ २०२५) पंजाबाहून नामदेव प्रतिवर्षी वारीला येत असत की त्यांनी वारी अजिबात टाकूनच दिली होती.

वर म्हटल्याप्रमाणे नामदेवांची पुष्कळशी कविता श्री. ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतरच्या काळांतील आहे. परंतु त्यांच्या सर्व वाङ्मयांत एवढ्या मोठ्या गोष्टीचा मागमूसहि कसा नाही ? समजा नामदेव पंजाबांत गेले असें गृहित धरलें तर त्यांचें सारें कुटुंब मागेच राहिलें होतें. परंतु त्यांच्याहि काव्यांत ह्या पंजाबांतील वास्तव्याचा ठावठिकाणा कसा नाही हाहि एक मोठा प्रश्नच आहे. कदाचित ते अभंग उपलब्ध नसतील असें म्हटलें तरी, ज्या नामदेवांची व त्यांच्या अभंगांची आठवण समाजानें मोठ्या जिव्हाळ्यानें व भक्तिभावानें शेंकडो वर्षे जिवंत ठेवली आहे तो समाज ही गोष्ट अजिबात कसा विसरणार ? निदान लोकवार्तेच्या रूपानें कां होईना ती खासच जिवंत राहिली असती; पण तसेंही घडलें नाही. तात्पर्य, कल्पनेला फार मोठा वाव दिल्याखेरीज ही गोष्ट शक्य दिसत नाही.

हिंदी पद्यांतील अंतर्गत पुरावा

आता ग्रंथसाहेबांतील पद्यें काय म्हणतात तें पाहूं. ग्रंथसाहेबांतील नामदेवांचीं समजलीं जाणारीं एकूण ६१ पद्यें आहेत. तीं पद्यें पाहणाऱ्यांच्या प्रथमतः कोणती गोष्ट लक्ष्यांत येत असेल तर ती ही की सर्व ठिकाणीं भगवद्भाव पहात असूनहि आणि विठ्ठल स्वरूप कृष्णाचें चरित्र वर्णन करीत असतांनाहि नामदेवांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तोंडांत विठ्ठलाचेंच नांव जास्त यावें हें साहजिक आहे; आणि तसें तें त्यांच्या अभंगांत येतेंही ! परंतु नामदेवांच्या ह्या पंजाबी पद्यांत, ज्या अर्थी त्यांचा कर्ता नामदेवच आहे, त्याअर्थी 'विठ्ठल' शब्द तर अवश्य येतोच; परंतु विठ्ठल किंवा गोविंद या नांवापेक्षा 'राम' हा शब्द जास्त येतो. एकूण ६१ पद्यांपैकी कांही निर्गुणपर आहेत, कांही गुरुभक्तिपर आहेत; परंतु विठ्ठलाचा उल्लेख मात्र केवळ ५–६ पद्यांत आलेला आहे. उलटपक्षीं 'रामा'चा उल्लेख मात्र सुमारें १८ ते २० पद्यांत आलेला आहे. उदा. पहिल्याच पदांत 'देवा, पाहत तारिअले । रामःकहत जन कहुन तरे ।।' असा रामभक्तीचा जिव्हाळा दिसून येतो. पंजाबांत गेल्यावर नामदेवामध्ये हा फरक होण्याचें काय कारण असावें ! तेथील जनतेकरता म्हणाल तर गुजरायच्यावर सरळ पंजाबपर्यंत रामोपासना फारशी प्रचलित होती असेंहि आढळत नाही. ही गोष्ट वारकरी संतपरंपरेला मोठीशी धरून असलेली दिसत नाही.

दुसरी गोष्ट अशी की ह्या पद्यांत गुरूचें माहात्म्य व उल्लेख पुष्कळ आहेत. उदा–'गुर चेले है मन आनि आ। जन नामैं तनु पछानिआ ।।११।। गुरमति राम नाम राहु सीता । प्रणवै नामा इऊ कहे गीता ।।२८।। वगैरे. 'गुरुपुत्र' असलेल्या पंढरपुरच्या नामदेवांनी आपल्या अभंगांत अशा रीतीने 'गुरु' शब्दाचा उल्लेख केला नाही. जेथे कोठे तसा प्रसंग असेल तेथे त्यांनी प्रत्यक्ष विसोबा खेचरांचा नांवासह उल्लेख केलेला आहे. ही गोष्ट फार बारीक आहे, पण तिचें महत्व कांही कमी नाही. जोशी ह्यांनी प्रसिद्ध केलेल्या ३७व्या पद्यांत उपास्य मूर्तीचें जें वर्णन केलेलें आहे तेंहि पांडुरंगाच्या मूर्तीचें नाही; तर शंखचक्रमाला तिलकधारी प्रभूचें आहे. (संखचक्रमाला तिलकु विराजित देखि जमु डरिऊ ।।)

तिसरी गोष्ट ही की एकतिसाव्या पद्यांत भगवत् स्वरूपांत रममाण झाल्यामुळे मला शून्य समाधि मिळेल असें म्हटलें आहे. (नामा कहे चितु हरि सिऊ सता सुन्न समाधि पावऊगो।।) ह्यांतील शून्य समाधि वारकरी सांप्रदायाशी विसंगत आहे.

चवथी गोष्ट ही की, एकविसाव्या पद्यांत 'द्वारका नगरी काहेको मगोल' म्हणजे द्वारका नगरींत एवढे मोंगल कां वरें, असें म्हटलें आहे. आणि 'हम चिनी पातिसाहु सांवले बरना' असा चिनी पातशाहाचा उल्लेख आला आहे. ह्या दोन्हीहि गोष्टी इतिहासविरुद्ध आहेत. तैमूरलंगाची स्वारी होईपर्यंत हिंदुस्थानला 'मोगल' माहीत नव्हता. त्याचप्रमाणें 'चीनी पातशहा' सहज तोंडांत येण्याइतका व धार्मिक वाङ्मयांत जागा पटकावून बसण्याइतका परिचित तर मुळीच नव्हता. ('हम चिनी' ह्याचा अर्थ श्री. जोशी ह्यांनी 'मी ओळखला' असा केलेला आहे. परंतु ह्या पद्यांतील 'मगोल' शब्द पाहिला की तो संशयास्पद वाटू लागतो. कदाचित तसा अर्थ असूनहि त्यांत श्लेष असू शकेल).

पांचवा पुरावा असा की एकोणपन्नासाव्या पद्यांत 'आऊ कलंदर केसवा । करि अवदाली भेसवा ।।' असा उल्लेख आहे. त्याचा अर्थ जोशी ह्यांनी मुसलमानी वेष असा केलेला आहे. परंतु अशा रीतीनें अब्दाली शब्दाचा उपयोग त्याकाळीं सर्रास होत असे असें मानण्यास कांहीच गमक नाही.

सहावा पुरावा आणि सर्वांत महत्त्वाची व आश्चर्याची गोष्ट ही आहे की सत्तेचाळिसाव्या पद्यांत बादशहाने नामदेवाची प्रचीति पाहाण्याकरता नामदेवास मारलेली गाय जिवंत करण्यास सांगितलें. ही कथा तशी प्रसिद्धच आहे. ती खरी असल्यास अर्थात दिल्लीच्या बादशहाची असू शकेल. महाराष्ट्रांत समज आहे त्याप्रमाणे बेदरचा बादशहा असणें शक्य नाही, कारण त्यावेळीं दक्षिणेंत मुसलमानांचा अंमलच नव्हता. तीर्थयात्रेंत कोणकोणते लोक बरोबर होते हें सांगतांना तीर्थावळींत तत्कालीन बहुतेक सर्व महाराष्ट्रीय संतांची नांवें दिलीं आहेत. त्यांत तथ्य किती आहे हा एक विचाराचा प्रश्न आहे. आपल्या मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या इतिहासांत बा. कृ. भिडे सुचवितात त्याप्रमाणे तीर्थाहून परत आल्यानंतर आणि ज्ञानेश्वरांनी समाधि घेण्याच्या पूर्वी केव्हा तरी, नामदेवांना विसोबाचा अनुग्रह झाला असावा (पृ. १०). कारण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तीर्थावळींतील नामदेव हे अपक्वावस्थेंत असल्याचें उघड आहे. विसोबांच्या अनुग्रहामुळें पूर्णता आल्यावर पुढें केव्हां तरी त्यांच्या सामर्थ्याची व अधिकाराची ओळख पटल्यावर त्यांचा द्वेष करणारा भागवत 'परीसा भागवत' झाला. तो ज्ञानेश्वरांच्या तीर्थाटनांत सामील होणार तरी कसा? परंतु हें सोडलें तरी अशी कल्पना करावयास यत्किंचितहि कारण नाही की नामदेव हे ज्ञानेश्वराबरोबर ते आपल्या कुटुंबांतील मंडळी बरोबर घेऊन गेले. तीर्थावळीचा पुरावा तर ह्याच्या अगदी उलट आहे. म्हणजे ते एकटेच गेले होते असें तीर्थावळीवरून दिसून येतें. त्यांची आई जर त्यांच्या बरोबर असती तर नामदेव केवळ अजाण लेकरू आहे, त्याला स्वतःच्या देहाचीहि शुद्ध राहत नाही म्हणून त्यांची तहानभूक तुम्ही जाणत जा असें पांडुरंगांनी ज्ञानेश्वरास सांगण्याचें कांहीच कारण नव्हतें. परंतु ग्रंथ साहेबांतील पद्यांत तर असें म्हटलें आहे की ज्या वेळेला बादशहा 'तुझा वध करतों' असें नामदेवांना म्हणूं लागला तेव्हा त्याची आई रडूं लागली ('रुदन करे नामँकी माई'–पद ४७). त्याहिपेक्षा विशेष चमत्कार हा आहे की नामदेवाची आई म्हणजे कांही सामान्य अधिकाराची बाई नसावी (तिच्या गाथेंतील अभंगांकडे पाहिलें तरी हें सहज लक्षांत येतें.) परंतु तुला हत्तीच्या पायीं देतों असें बादशहानें नामदेवास म्हणतांच नामदेवाची आई एखाद्या सामान्य बाईप्रमाणें आक्रोश करून म्हणूं लागली की, 'बाबा दे सोडून रामाचें भजन आणि मुसलमान हो कसा! ('छोडि रामकी न भजहि खुदाइ'— इथेंहि ती रामाचेंच नांव घेतें, विठ्ठलाचें नांव घेत नाही); तेव्हा तेथेंच नामदेवांचें व तिचें भांडण होतें आणि नामदेवानें तिला साफच सांगितलें की आजपासून मी तुझा मुलगा नाही व तूं माझी माता नाही; प्राण गेला तरी मी हरीचें भजन सोडणार नाही. (न हऊ तेरा पूंगडा न तूं मेरी माई। पिंडु पडे तऊ हरीगुण गाई ॥) ह्या पद्यांतील सारेंच वर्णन इतकें आचरटपणाचें आहे की जास्त टीका करण्याचेंहि कारण नाही. नामदेवांच्या मातृत्वाचा मान मिळालेल्या बाईच्या तोंडून असे उद्गार निघणेंहि शक्य नाही. अशा प्रकारचीं हीं पद्यें केवळ त्यांत भक्तिभाव आहे अथवा तीं कोण्यातरी नामदेवाच्या नांवावर मोडतात म्हणून विठ्ठलाच्या गळ्यांतील ताईत असलेल्या आद्य नामदेवांचींच आहेत असें म्हणण्याचा आग्रह धरणें चूक आहे.

सारांश, कोणत्याहि रीतीनें विचार केला तरी आद्य नामदेवांचें पंजाबांतील वास्तव्य सिद्ध होऊं शकत नाही. आजपर्यंत अनेक विद्वान लेखकांनी ह्या कल्पनेला उचलून धरलें. श्री जोशी ह्यांनी तर आद्य नामदेवांच्या गळ्यांत पंजाबांतील वारकऱ्यांच्या वसाहती बांधण्याकरता अगदी १९३६ च्या पुस्तकापर्यंत आधार दिले आहेत. त्यावरून फार झालें तर कोणीतरी वारकरी नामदेव केव्हातरी पंजाबांत होता येवढेंच सिद्ध होईल; व तें आम्हांला मान्य आहे; परंतु आद्य नामदेवांचें—जनाबाईच्या नामदेवांचें—पंजाबांत अस्तित्व कोणत्याहि तर्कानें सिद्ध होऊं शकत नाही. अर्थात, ह्या लेखावरून प्रस्तुत लेखकाला नामदेवांची थोरवी व मोठेपणा मान्य नाही अशी समजूत कोणीहि करून घेऊं नये. उलट श्री. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदि संत मंडळी व त्यांचा वारकरी संप्रदाय ह्याबद्दल त्याच्या मनांत नितांत आदर आहे व त्यांनी केलेलें राष्ट्रीय कार्याचें महत्व तो जाणून आहे. तरी पण शास्त्रीय दृष्टीनें विचार करावयास बसल्यावर जें त्याला सत्य वाटलें तेंच त्यानें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

पासंग

(ले०—सौ. कुसुमावती देशपांडे; प्रकाशक—नागपूर प्रकाशन, नागपूर)

वाङ्मय आणि वाङ्मयाची समीक्षा यांचे संबंध फार निकटचे व जिव्हाळ्याचे आहेत. पण पुष्कळदा या संबंधांच्या स्वरूपाबाबत ज्या कल्पना नामवंत म्हणून गणल्या गेलेल्या विद्वानांकडूनहि प्रसृत केल्या-जातात त्या इतक्या चक्रीच्या व गोंधळ निर्माण करणाऱ्या असतात की, त्यामुळे कलात्मक वाङ्मय राहतें एका बाजूला व समीक्षकांतील शुष्क वादावादीलाच प्राधान्य प्राप्त होतें. कुंपणानेच शेत खाऊन टाकावें, अशांतलाच हा प्रकार आहे. वस्तुतः वाङ्मयसमीक्षकांचें मुख्य काम म्हणजे वाङ्मयाचें रक्षण करणें, त्याची जोपासना करणें आणि विशुद्ध रसग्रहणाच्या द्वारें सामान्य वाचकांची रसास्वाद-शक्ति व अभिरुचि उन्नत करणें, हें होय. पण पुष्कळदा अनेक समीक्षक रसग्रहणाऐवजी न्यायाधीशाचा आव आणून आपले निवाडे जाहीर करण्यांतच वाङ्मयसमीक्षेचें सार्थक मानतात जणूं कांही कलाकार म्हणजे एक सामाजिक गुन्हेगारच आहे. आणि त्याची कलाकृति म्हणजे एक संशयित गुन्हा असून तो हुडकून काढणें व त्याला आपल्या निवाडयांच्या माध्यमांतून कमी-अधिक सजा देणें, हेंच समीक्षकाचें कर्तव्य !

साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रांत ही फुकट फौजदारी व 'अन्नावारी मॅजिस्ट्रेटी' इतकी बोकाळली आहे की, ह्या अनिष्ट प्रवृत्तीला वेळींच आळा न बसल्यास महाराष्ट्रांत कलानिर्मिति अशक्यप्राय होऊन बसेल.

या दुर्दैवी प्रवृत्तीच्या संसर्गापासून कुसुमावतीबाई ह्या अलिप्त राहिल्या आहेत, ही विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट आहे, असें मला वाटतें. त्यांचा 'मराठी कादंबरीचें पहिलें शतक' हा दोन खंडांत प्रसिद्ध झालेला समालोचनात्मक ग्रंथ म्हणजे सदभिरुचि व समतोल रसग्रहण यांचा एक उत्कृष्ट नमुना आहे. कुसुमावतीबाईंना साहित्यसमीक्षक या नात्याने जो लौकिक महाराष्ट्रांत प्राप्त झाला आहे, तो अनन्यसाधारण आहे. आणि याचें मुख्य कारण म्हणजे कादंबरीवरील आपला मोठा ग्रंथ प्रसिद्ध करण्यापूर्वी त्यांनी लिहिलेले कांही सुंदर टीकात्मक लेख व वाङ्मय परिषदांच्या व्यासपीठावरून दिलेलीं व्यासंगपूर्ण भाषणें. 'पासंग' म्हणजे या टीकात्मक लेखांचा व भाषणांचा संग्रह करणारें १३३ पानांचें लहानसें पुस्तक आहे. या पुस्तकाला 'पासंग' हें नांव देण्यांत लेखिकेने औचित्य दाखविलें असून 'पासंग' हें नांव सार्थ आहे. कारण अत्यंत नाजुक तराजूची दांडी स्थिर व समतोल राहण्यासाठी सूक्ष्मतम पासंगाची जशी आवश्यकता असते तशीच कलाकृतींची समीक्षा करतांना सर्व पूर्वग्रहांच्या जड वृत्तींना बाजूस सारून, रसग्रहण यथार्थतेने व्हावें यासाठी सूक्ष्म व तरलतम अशा सहानुभूतीचे पासंग आपल्या अंतःकरणाच्या अंतराळांतून बाहेर काढतां आले तरच ती समीक्षा सफल होऊं शकते. कलाकृति ही अतिनाजुक अशा तराजूसारखी असते. तींत तोल असतो. पण तो आंतरिक असतो. तो स्थूल दृष्टीला दिसत नाही व पूर्वग्रहदूषित अशा स्थूल व जड वृत्तीला तो भासतहि नाही. अशा दृष्टीला व वृत्तीला या कलाकृतिरूप तराजूची दांडी अखंड खालीवर होत आहेसें भासतें. आपल्या आंतरिक सहानुभूतीचे अति नाजुक पासंग या अथवा त्या पारडयांत टाकून नित्य आंदोलित होणारी ही दांडी स्थिर करतां आली तरच कलाकृतीचा आस्वाद यथार्थतेने रसिकाला व समीक्षकाला घेतां येईल. साहित्य समीक्षेच्या या अति नाजुक 'पासंग-प्रक्रियेचो' कुसुमावतीबाईंना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सखोल अशी जाणीव आहे. 'पासंग' हें नांव याच जाणिवेंतून निष्पन्न झालें असावें.

निदान या जाणिवेच्या खुणा या पुस्तकांत सर्वत्र विखुरलेल्या आहेत. विशेषतः 'नवा शिपाई'; 'आम्ही कोण ?' आणि 'केशवसुतांच्या काव्यदृष्टींतील उत्क्रांति' या तीन प्रबंधांत ही 'पासंग–प्रक्रिया' उत्कृष्ट रूपांत प्रकट झाली आहे. वानगीदाखल त्यांचा 'आम्ही कोण ?' हा केवळ नऊ–दहा पानांचा प्रबंध वाचकांनी अवश्य न्याहाळून पाहावा. केशवसुतांची ही सुप्रसिद्ध व अति गाजलेली कविता अनेकांनी या पूर्वी चर्चिली होती. रहाळकर, राजवाडे, वर्तक आणि रविकिरण मंडळाचे अध्वर्यु व सुप्रसिद्ध कवि माधवराव पटवर्धन इत्यादि नामवंत समीक्षकांनी या कवितेचा आशय विशद करून दाखविण्याचा खटाटोप केला होता. फार कशाला, श्री. आ. रा. देशपांडे, म्हणजे महाराष्ट्राचे नामवंत कवि 'अनिल' यांनी देखिल या कवितेवर पटवर्धनांनी केलेल्या हल्ल्याला उत्तर देण्याचा प्रयत्न केला होता. पण तोहि त्रोटक व अपुराच ठरला.

'आम्ही कोण ?' या कवितेविषयी "सर्वांनीच गृहीत धरलेली कल्पना अशी की, ती कवीच्या कार्याविषयी आहे." आणि कवि आपल्या स्वतःच्या कार्याबद्दल इतक्या बेफाट अहंतेने परिपूर्ण व अत्युक्तियुक्त असे उद्गार काढूं तरी कसे शकतो ? असा प्रश्न अनेकांनी उभा केला.—

'आम्ही कोण म्हणून काय पुससी ?
आम्ही असूं लाडके
देवाचे; दिधले असें जग तये
आम्हांस खेळावया'

अथवा

'दिक्कालांतुनि आरपार अमुची
दृष्टी पहाया शके'

अशीं बेफाम विधानें आपल्या कार्याविषयी करणारा कवि हा रोगट मनोवृत्तीचा असला पाहिजे असा ध्वनि काढण्यापर्यंत टीकाकारांनी मजल मारली होती. परंतु पासंग–प्रक्रियेचा अवलंब करून कुसमावतीबाईंनी या कवितेची जी सूक्ष्म व सहृदय चर्चा या प्रबंधांत केली आहे ती पाहतां या कवितेवर उठविण्यांत आलेली झोड किती जडबुद्धीची आणि उथळ व बेजबाबदार वृत्तीची द्योतक होती, हें कोणासहि सहज दिसून येईल.

'आम्ही कोण ?' या कवितेंत 'कवि' हा शब्द कोठेहि वापरला नाही, आणि सबंध कवितेंत कांही मनोव्यापारांचें, क्रियांचें व परिस्थितीवर होणाऱ्या त्यांच्या परिणामांचेंच वर्णन कसें केलें आहे, हें कुसुमावतीबाईंनी अस्सल रसिकास व समीक्षकास साजेशा नमुनेदार कसबाने दाखविलें आहे. 'आम्ही कोण ?' कवितेंत केशवसुतांनी साऱ्या प्रतिभावंतांच्या कार्याचें सुंदर दिग्दर्शन कसें केलें आहे हें कुसुमावतीबाईंनी उत्कृष्ट रीतीने स्पष्ट करून दाखविलें आहे. हा लहानसाच प्रबंध म्हणजे पासंग–प्रक्रियेचा अवलंब करून कलास्वाद कसा घ्यावा व कलेचें मर्म कसें ओळखावें, याचा एक आदर्श आहे असें म्हटल्यास ती मुळीच अतिशयोक्ति होणार नाही.

सारांश 'पासंग' हें लहानसेंच पुस्तक वाङ्मयसमीक्षेच्या क्षेत्रांत नवी व आशयपूर्ण भर टाकणारें आहे, असें म्हणण्यास मला मुळीच प्रत्यवाय वाटत नाही.

या पुस्तकांतील सारेच प्रबंध इतके निर्दोष व नवा आशय प्रकट करणारे आहेत, असें मात्र म्हणतां येत नाही. विशेषतः 'आधुनिक मराठी कादंबरीचा उत्क्रांति मार्ग' हा प्रबंध निदान मला तरी बराच निराशाजनक वाटतो. 'कादंबरीचें पहिलें शतक' हा मोठा ग्रंथ प्रकाशित केल्यानंतर हा छोटासा प्रबंध या पुस्तकांतून गाळून टाकला असता तर अधिक बरें झालें असतें, असें मला वाटतें. कादंबरीच्या बाबतींत कलात्मक वाङ्मय व मनोरंजनार्थ निर्माण झालेलें वाङ्मय या उभय प्रकारांना एकाच सदरांत घालून मराठी कादंबरीचा उत्क्रांतिमार्ग शोधणें हें मुळांतच चुकीचें आहे. यांत 'आधुनिकता' व 'उत्क्रांति' या शब्दांच्या व्याख्याहि कुसुमावतीबाईंच्या मनांत स्पष्ट आहेत, असें दिसत नाही. 'कलात्मक' हें विशेषण कोणत्या कादंबरीस लावावें, हें आधी निश्चित करून मग त्या कादंबरीची, केशवसुतांच्या काव्याची जशी पासंग–

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रक्रियेनुसार समीक्षा केली, तशी समीक्षा करण्याचा प्रयत्न कुसुमावतीबाईंनी केला असता, तर निव्वळ शेरेमारीत सुटणाऱ्या प्राध्यापकीय प्रवृत्तीच्या आहारीं जाण्याचा मोह त्यांना सहज टाळतां आला असता. असो. पासंग–प्रक्रियेच्या तरल व पूर्वग्रहशून्य वृत्तींत सर्वकाळ व सर्वच वाङ्मयप्रकारांबाबत कोणत्याहि वाङ्मयसमीक्षकाला राहतां येणें अत्यंत कठिण आहे, एवढाच निष्कर्ष या प्रकारावरून निघतो.

—पु. य. देशपांडे

काळोखाचीं पिसें

(लेखक—सदानंद रेगे; प्रकाशक–पॉप्युलर प्रकाशन, मुंबई)

कुसुमावतीप्रणीत पासंग प्रक्रियेच्या दृष्टीने 'काळोखाचीं पिसें' या श्री. सदानंद रेगे यांच्या कथासंग्रहाचें निरीक्षण केल्यास रेगे हे एक अस्सल कलावंत आहेत, असें कोण्याहि सहृदय वाचकाला सहज दिसून येईल. या कथासंग्रहाला प्राध्यापक वा. ल. कुळकर्णी यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे, ती देखील प्रतिष्ठित बनूं लागलेल्या प्राध्यापकीय चिकित्सापद्धतीपासून बरीच अलिप्त व कांही बाबतींत मार्मिकहि आहे. " एक प्रकारचें अबोल, जीव गुदमरून टाकणारें दुःख हा रेगे यांच्या अनेक कथांचा स्थायीभाव आहे, " हें प्रा. कुळकर्णी यांचें विधान स्थूल मानाने खरें आहे. स्थूल मानाने म्हणण्याचें कारण 'दुःख' हा शब्दहि फारच स्थूल आहे. सारें मानवी जीवन सुखदुःखांच्याच धाग्यादोऱ्यांनी विणलेलें जात असतें. आणि कलात्मक वाङ्मयांत या सुखदुःखांची अनंतविध वीण अनंत प्रकारांनी आविष्कृत होत असते. रेग्यांच्या बहुतांश कथांतील स्थायीभाव दुःख हा आहे पण हें दुःख अबोलहि नाही आणि जीव गुदमरून टाकणारें तर नाहीच नाही. आत्यंतिक दुःखमय प्रसंग चित्रित करतांनाहि रेगे गुदमरून जात नाहीत. उलट, आत्यंतिक दुःख देखील चित्रित करतांना रेगे यांची भेदक दृष्टि त्या दुःखाच्या पलीकडे वावरणाऱ्या अज्ञात, गूढ अशा क्षितिजावर खिळलेली असते. आत्यंतिक दुःखाच्या भरीव व गडद काळोखाला आरपार भेदून जाणारे प्रकाशकिरण रेगे यांच्या कलात्मकतेंत चकाकतात. आणि दुःखाच्या पलीकडे असलेलें क्षितिज तें थोडेसेच कां होईना, पण उजळतात. आणि यांतच रेगे यांच्या विशिष्ट कलेचें खरें सामर्थ्य साठलेलें आहे. रेगे दुःखाला गोंजारीत-गोंजारीत बसत नाहीत; त्याच्या आहारींहि ते जात नाहीत. आणि म्हणूनच सूर्योदयापूर्वीच्या अथवा सूर्योदयानंतरच्या अंधुक प्रकाशांत, अधिक उजळ अशा क्षितिजापासच्या आकाशी पार्श्वभूमीवर झाडांच्या वा माणसांच्या छायाकृति जशा सुंदर दिसतात तसें सौंदर्य रेगे यांच्या अनेक कथांतून ओसंडत राहतें. आत्यंतिक दुःख देखील अशा सौंदर्यपूर्ण रीतीनें हाताळतां येणें, हें सोपें नाही. अस्सल व अप्रतिम कलात्मकता अंगीं बाणल्याशिवाय कलेचा हा प्रकार पेलतां येणें अशक्यच आहे.

मानवी जीवनांतील अनीव दुःख हाताळीत असतांहि रेगे रडत नाहीत व रडवीतहि नाहीत. त्यांची भावार्त पण तरल शब्दकळा आणि भेदक कल्पकता अशी कांही लोकविलक्षण प्रतिमासृष्टि दृष्टीसमोर उभी करते की, जणूं कांही दुःख नसतें, तर जीवन आशयशून्य, आकारशून्य व सौंदर्यविहीन झालें असतें. दुःखजन्य गडद काळोखाला आरपार भेदणारी दृष्टि प्राप्त झाल्याशिवाय जीवनांतील गूढ आशयाचा स्पर्श देखील मानवी मनाला होणें दुरापास्त आहे रेगे यांच्या कलेंत या स्पर्शाची जाणीव जागोजाग दिसून येते. या जाणिवेची अद्भुतरम्य साक्ष त्यांच्या 'पाळणा' या गोष्टींत प्रकर्षाने प्रत्ययास येते. ही कथा जागतिक वाङ्मयांत देखील मानाचें स्थान मिळविण्याइतक्या उच्च प्रतीची आहे.

साधीं माणसं, नित्य परिचयाचें दारिद्र्य, दुःख व मृत्यु यांचे प्रसंग, अशा साध्याच विषयांतून मोठा आशय ध्वनित करण्याची रेगे यांची कथन–कला महाराष्ट्रांत तरी अनन्यसाधारणच मानली पाहिजे. दुःख व दारिद्र्य यांच्या पार्श्वभूमीवर रेगे कधी कधी एक विचित्र पण फार मजेदार हास्यहि निर्माण करू

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

शकतात. या कथा-संग्रहांतील ‘ माझा बाप मरतो त्याची गोष्ट ’ ही कथा या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे. प्रा. कुळकर्णी यांनी रेगे यांच्या या कलाविशेषाबाबत विल्यम सोरायनच्या प्रतिभेची आठवण करून देणारा विशेष, अशा आशयाचें जें विधान केलें आहे, तें बरेंच सार्थ आहे. पण रेगे यांचा हा कथासंग्रह वाचल्यावर माझ्या मनावर तरी असा प्रभाव पडला की त्यांची प्रतिभा बरीचशी नावीन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. पण तिला अजून आशयाचा भरदारपणा यावयाचा आहे तो येण्याच्या मार्गात आहे याची साक्ष ‘पाळणा’ या अप्रतिम कथेंत पटते. साऱ्या जगाला आजतागायत १९५४ वर्षांपर्यंत ज्यानें प्रभावित केलें अशा येशु ख्रिस्ताचा मृत्यु आणि काळाच्या अंतापर्यंत प्रभावशून्य राहणाऱ्या एका अत्यंत गरीब घराण्यांतील एक अर्भकाचा जन्म, असा हा जन्ममृत्यूचा ‘पाळणा’ ज्याच्या लेखणींतून आन्दोलित होऊं शकतो, त्या श्री. सदानंद रेगे यांच्या कलात्मक लेखणीला फार मोठें भवितव्य आहे, असें मला म्हणावेसें वाटतें. पण त्याबरोबरच रेगे यांना हेंहि सांगावेसें वाटतें की, हा ‘पाळणा’ सतत हलवीत ठेवणें, ही सोपी गोष्ट नाही. फार मोठे परिश्रम व फार मोठी तपस्या त्यासाठी आवश्यक आहे. नाहीतर हा पहिला ‘पाळणा’ शेवटचाहि ठरण्याची धास्ती आहे. असें न होवो, आणि आवश्यक ते परिश्रम व तपस्या यांच्या दिव्यांतून पार पडण्याचें सामर्थ्य रेगे यांना लाभो, हीच माझी इच्छा.

—पु. य. देशपांडे

(नभोवाणी, नागपूर केंद्र, यांच्या सौजन्यानें)

शोध

(लेखिका—सौ. वसुंधरा पटवर्धन; प्रकाशक—उदय साहित्य प्रकाशन, पुणें २; मूल्य २॥ रुपये)

पुण्याच्या सुप्रसिद्ध कथालेखिका सौ. वसुंधरा पटवर्धन यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. वसुंधराबाईंनी कथालेखन सुरू करून फार वर्षें झालीं नाहीत आणि अल्पावधींतच त्यांची गणना मराठींतील प्रमुख कथाकारांत होऊं लागली. सौ. मालतीबाई बेडेकर (विभावरी शिरूरकर) यांचा अपवाद सोडल्यास आजच्या लेखिकांमध्ये त्या अग्रगण्य आहेत. त्यांचें सारेंच लेखन मोठें सहजसुंदर आणि गुणसमृद्ध आहे. मराठीशिवाय इतर कोणत्याहि भाषेचा गंध नसलेल्या, विश्वविद्यालयीन शिक्षणाचा लाभ नसलेल्या, या कथाकर्त्रीने जें रसोत्कट, सुबोध व रुचिर लेखन केलें आहे तें अत्यंत प्रशंसनीय आहे. सूक्ष्म निरीक्षण, व्यापक सहानुभूति सुबोध भाषाशैली संवेदनाशील अंतःकरण, या गुणांच्या आधारावर या प्रतिभाशालिनीने कथालेखनाच्या क्षेत्रांत विलोभनीय कर्तबगारी करून दाखविलेली आहे. कथाविषय निवडतांना वसुंधराबाईंनी, जें त्यांच्या सूक्ष्म अवलोकनांत आलें, ज्यानी त्यांच्या भावनाशाली मनावर प्रतिक्रिया झाली, ज्यामुळे त्यांच्या अंतःकरणांत क्षोभ उत्पन्न झाला अशाच घटनांचा त्यांनी उपयोग केलेला आहे. कथेची मांडणी साध्या सुबोध भाषेंत केलेली आहे कुठल्याहि उथळ अगर कृत्रिम कल्पनांचा त्या वापर करीत नाही. जें त्यांनी अनुभवलें, जें त्यांच्या अवलोकनांत आलें तेंच त्यांनी उत्कटपणें सांगितलें आहे. वसुंधराबाईंच्या ललितलेखनांतील स्त्रियांच्या स्वभावरेखा फारच उठावदार आहेत. स्त्रीचीं सुप्त सुखदुःखें, विचार, तळमळ, आशा-निराशा यांचें चित्रण भावनाशाली, काव्यात्म वृत्तीची, उत्कट मनोरचनेची स्त्रीच करूं शकते. पहिल्या प्रीतीचीं स्मृति-चिन्हें नष्ट करण्यासाठी तगमगणारी, परंतु तें ‘शल्य’ नष्ट न करूं शकणारी शांता, कुटुंबासाठी नोकरी करणारी, कष्ट उपसणारी व स्वतःचें मन मारणारी ‘पराभूत’ कथेंतील इंदू, ‘शोध’ या कथेंतील यौवनसुलभ आकर्षणाने पीडित झालेली नमू, ‘हेलपाटे’ या कथेंतील सहजीवनाला पारखी झालेल्या, संसारसुखाला आचवलेल्या चंपूताई या साऱ्याच स्वभावरेखा अत्यंत उत्कृष्ट साधल्या आहेत. ‘पराभूत’ या कथेंत इंदूच्या घरची परिस्थिति किती सहजतेने वर्णिली आहे. कोणतेंहि सामाजिक सत्य बिंबवण्याचा त्या प्रयत्न करीत नाहीत, व म्हणूनच त्यांच्या कथा अकृत्रिम व सहजसुंदर वाट-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तात. 'अपघात' व 'नावेंतील पाणी' (शीर्षक अन्वर्थक नाही) या कथा मात्र सामान्य आहेत. 'अपघात'मधील पाल्हाळिकपणा कथेच्या एकंदर परिणामाला मारक ठरतो 'नावेंतील पाणी' या कथेंतील बाबीकाकांची व्यक्तिरेखा मात्र चांगली साधली आहे. 'पराभूत' (ही कथा एका साहित्यिक मासिकानें परत केली होती म्हणतात), 'हेलपाटे' 'शोध' व 'शल्य' या सारख्या सुंदर कथांचें वाचन केल्यास वसुंधराबाईंच्या भावनासंपन्न, सहृदय, संवेदनाक्षम व्यक्तित्वाचा व रसोत्कट, जीवनदर्शी लेखनाचा प्रत्यय वाचकांस येईल. हा पहिलाच संग्रह त्यांच्या ललित लेखनांतील गुण-विशेषांची साक्ष आहे.

—पां. व. गाडगीळ

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०,

यांचीं शालेय पुस्तकें

अनुभवी शिक्षणतज्ज्ञांचें साहाय्य आणि नमुनेदार संपादन
यांमुळे या प्रकाशन संस्थेचीं पुस्तकें सर्वत्र लोकप्रिय ठरलीं आहेत.

सारस्वत पाठमाला पुस्तकें १ ते ४
(माध्यमिक शाळांतील वर्ग ५, ६, ७ व ८ करितां) किंमती अनुक्रमें रु. १, १८=, १। व १॥.

भारतीय इतिहास प्रवेश (वर्ग ५ करितां इतिहासाचें सर्वोत्कृष्ट पुस्तक) किं. १ रु.

भारतीय इतिहास परिचय भाग १, २ व ३
(वर्ग ६, ७ व ८ करितां इतिहासाचीं सर्वांनी प्रशंसिलेलीं पुस्तकें) किंमती अनुक्रमें रु. १, १ व १।.

मॅट्रिकचा भूगोल (आवृत्ति तिसरी) किंमत फक्त ३ रुपये.

विलायतेंतील अनुभव (वर्ग ९ करितां स्थूलवाचनाचें पुस्तक) किंमत १॥ रु.

आधुनिक रसायनशास्त्र (आवृत्ति तिसरी) किंमत २॥ रु.

वरील सर्व पुस्तकें बोर्डानें मंजूर केलीं असून शिक्षक हींच पुस्तकें पसंत करतात.
ज्या शाळेजवळ नमुन्याचीं पुस्तकें नसतील
त्यांनी मागणी केल्यास तीं विनामूल्य पुरविण्यांत येतील.

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०, कांग्रेसनगर, नागपूर १

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

हत्या

[लेखक—श्री. ना. पेंडसे; प्रकाशक—मौज प्रकाशन, मुंबई ४]

सुप्रसिद्ध लेखक श्री. ना. पेंडसे यांनी आप्त-जनांनी आबाळलेल्या, परिस्थितीने अव्हेरलेल्या आणि समाजाच्या प्रचलित घडणीचें भक्ष्य बनलेल्या हनुमंता उर्फ हत्या या कोकणी पोराची हकीकत सांगितलेली आहे. ही कादंबरी हत्याचें आत्मवृत्त आहे. ज्या कोकणच्या निसर्गरम्य परंतु अठराविश्वे दारिद्र्याने गांजून गेलेल्या प्रदेशांत पेंडसे यांच्या इतर कथा जन्माला आल्या, त्याच कोकणच्या पार्श्वभूमीवर हत्याची जीवनकथा रंगविलेली आहे. कोकणांतील निसर्गाचें वर्णन सुटें व वेगळें असें कधीच केलेलें नाही तर निसर्गातूनच जीवन विकसित झाल्याचें दर्शविलें आहे. कोकणांतील निसर्ग हा त्या प्रदेशांतील अवघ्या संसाराचा एकजीव भाग आहे. हत्याचें स्वच्छंद बालपण करवंद्याच्या कातळावर, दुर्गेश्वराच्या हद्दीवर, सुरूच्या झ.डांत, सुपारीच्या बागांत, करवंदीच्या उंच जाळ्यांत, पुळणींत, वाऱ्या वादळांत बेहोष रीतीने गेलें. हत्याच्या जीवनाचा विकास वर्णन करीत असतांना पेंडशांच्या भाषेंत असलेला जोष आणि बेहोषी प्रत्ययास येते. पहिल्या प्रकरणापासूनच वाचकांच्या मनाची पकड घेऊन ती अधिक बळकट करीत पुढे झेप घेणाऱ्या या कादंबरींत पेंडशांच्या ललितलेखनाचे सारे गुण एकवटले आहेत. वास्तवतेचें निरभिनिवेश प्रामाणिक चित्रण, मानवी जाणिवेच्या कक्षांचा विस्तार, जीवनांतील कुरूप व अमंगल घटनांचें सहानुभूतिपूर्ण दर्शन व मानवतेवरील प्रगाढ श्रद्धा या गुणांमुळे पेंडसे यांचें सारेंच लेखन विलोभनीय झालें आहे. 'एल्गार' या आपल्या पहिल्याच कादंबरीने समस्त मराठी रसिकांना विस्मयचकित करणाऱ्या या कादंबरीकाराने मराठी कादंबरीवाङ्मयाची उंची आपल्या ललित कृतीने वाढविली आहे व विभावरी शिरूरकरांनंतर मराठी कादंबरीवाङ्मयांत मोलाची भर टाकलेली आहे. एल्गार, हद्पार, गारंबीचा बापू व हत्या या चार कादंबऱ्यांनी मराठी वाङ्मय समृद्ध केलें आहे.

ठसठशीत घटना, सहजसुंदर संवाद, कथावस्तूचें भरदार अंग, स्फोटक प्रसंग, माणूस व परिस्थिती यांच्या संघर्षाचें, जीवनाविषयी ममत्व बाळगून केलेलें चित्रण आणि निकोप जीवनदृष्टि यांमुळे पेंडशांचें लेखन अतुलनीय झालें आहे 'हत्या' या कादंबरीचेंच उदाहरण घेऊं. सामान्य प्रसंगांची गुंफण व सामान्य संसारी माणसांचीं स्वभावचित्रें इतकीं अकृत्रिम भाषेंत रेखाटलीं आहेत, की, वाचकांना आपल्या डोळ्यांसमोर तीं कोकणी माणसें व ते प्रसंग दिसूं लागतात. लेखकाने कोठेंहि निवेदन केलेलें नाही. हत्या, त्याचे आजोबा, वडील, सदूकाका, परसू, वेंडरकाकांची सिंधू, त्याची ताई, त्याचा कुणबी मित्र भुत्या यांच्या स्वभावरेखा साध्या संवादांतून जिवंत होतात. प्रसंगांची निर्मितीसुद्धा कृत्रिमपणे केलेली नाही. हत्या आपलें आत्मचरित्र संवादरूपाने सांगत आहे आणि या संवादांतून व्यक्ति आणि घटना सजीव होत आहेत. सामान्यांतील सामान्य प्रसंग सहजसुंदर संवादांतून प्रक्षेपित होतात आणि कथेंतील माणसें ठसठशीत स्वरूपांत आपल्यासमोर उभीं राहतात. करवंद्याच्या परिसरांत घडलेल्या घटना अत्यंत संयत भाषेंत वर्णन केलेल्या आहेत. हळव्या भावनेला बळी न पडतां, भावविवश न होतां, काव्यात्म भाषेंत न गुरफटतां, अत्यंत कणखर भाषेंत कोकणांतील कणखर जीवन चित्रित केलेलें आहे. दारुण परिस्थितीचें वर्णन करतांना कोठेंहि भडकपणा आढळत नाही. त्यांच्या लेखणींत जसा जोष आहे तसाच लवचिकपणाहि आहे.

हत्या आपल्या आठवणींतून स्वभावचित्रांचें एक दालनच (Gallery) उभें करतो. कणखर, निश्चयी परंतु प्रेमळ आजोबा, चिडखोर बाबा, देखण हसतमुख सदूकाका, कष्टाळू परसू, सदूकाकांवर प्रेम करणारी प्रेमळ स्वभावाची सुंदर सिंधू, कारुण्यमूर्ति ताई, हत्यावर एकनिष्ठ प्रेम करणारा दरिद्री, संस्कारशून्य भुत्या हीं महत्त्वाचीं पात्रें आणि अनेक गौण पात्रें लहान लहान प्रसंगांतून वर्णन केलेलीं आहेत. कोकणच्या रंगभूमीवर होणाऱ्या रुद्रगंभीर नाट्यांतील हीं पात्रें सजीव वाटतात. परंतु या नाट्यप्रसंगांत अतिरंजितपणाचा कुठेंहि वास येत नाही. आजोबांची

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
अनुक्रमणिका
विदर्भ साहित्य संघ

व्यक्तिरेखा मराठी कादंबरी वाङ्मयांत अमर होणार आहे. अत्यंत प्रेमळ, दृढनिश्चयी, हत्याला शिवी दिल्यानंतर स्वतःच्या तोंडांत मारून घेणारे, हत्याच्या बापाने इस्टेट विकायला काढल्यावर 'आजपासून मी मेलों असें समज' असे तळमळून उद्गार काढणारे परंतु बाबा तुरुंगांत गेल्याबरोबर त्याच्या मदतीस धावणारे, मोटरमध्ये पहिल्यांदाच बसल्याबरोबर तिच्या धक्क्याने वाकडेतिकडे होतांना जीवनोत्साहाने हसणारे, हत्याच्या जीवनाला वळण लावावें म्हणून अपरिमित कष्ट करणारे प्रेमळ आजोबा मराठी वाचकांच्या चिरकाल स्मृतींत राहतील. आजोबांची स्वभावरेखा कर्त्यानें अत्यंत सामान्य प्रसंगांतून निर्माण केलेली आहे.

हत्याचेंच हें आत्मचरित्र असल्यामुळे त्याची व्यक्तिरेखा जास्त ठसठशीत स्वरूपांत वर्णन केली आहे. परसूशीं प्रत्येक गोष्टींत बरोबरी करण्याची ईर्षा बाळगणारा, दा लीला जावें लागूं नये म्हणून देवीला नवस करणारा, आपल्या वहिणीच्या करुण जीवनामुळें हताश होणारा, नाम्या कुत्रा व पिंगी म्हैस यांच्यावर लोभ करणारा, आजोबांवर प्रेम करणारा, भुत्यासारख्या दलित वर्गांतील मुलावर भावाप्रमाणे लोभ करणारा हत्या प्रथमपासूनच आपलें प्रेम संपादन करतो. करवंद्याच्या कातळावर चढणारा हत्या पहिल्याप्रसंगापासूनच आपलें मन आकर्षित करतो आणि आपण कथेच्या ओघांत त्याच्या बरोबरच वाहत जातों. त्याच्या बाळबोध भावविश्वांत आपण सामावून जातों. माजघरांत भिंत उभी होत असतांना त्याच्याबरोबरच आपणहि दुःखी होतों, ताईचे अश्रू पाहून रडणाऱ्या हत्याप्रमाणें आपणहि व्यथित होतों, आजोबांचे कष्ट, त्यांची पायपीट पाहतांना हत्याप्रमाणेच आपणहि कष्टी बनतों. त्याच्या मनःस्थितीप्रमाणें आपलीहि मनःस्थिति बदलते, इतकें आपण या नाटकांत गुंग, धुंद होऊन जातों. जीवनाविषयी एक एक विलक्षण उफाळणारा उत्साह पेंडश्यांच्या ठिकाणीं आहे. या जीवनोत्साहांत एक बेफामपणा आहे. या बेहोषींतूनच त्यांचीं जीवनचित्रें निर्माण झालीं आहेत. कोकणच्या भूमीवर त्यांचें अलोट प्रेम आहे आणि या प्रेमानेच ह्यांनी कोकणांतील संततचें दारिद्र्य भोगणारीं बरींवाईट, खडवडीत माणसें रंगविलीं आहेत. त्या माणसांची रोखठोक वागणूक, ठेमेठोक भाषा, व्यवहारी बुद्धि, आणि जीवनकलहाला तोंड देण्याचा कणखरपणा त्यांनी उत्कृष्टपणें चित्रित केला आहे. त्यांचें जीवनचित्र रेखाटतांना त्यांनी प्रसंगांची व घटनांची इतकी रेलचेल उडवून दिलेली आहे की, वाचक संभ्रमित होतो आणि असें वाटूं लागतें की, पेंडशांना नाट्यपूर्ण प्रसंग रेखाटण्याचा भयंकर उत्साह आहे आणि त्यांना आपल्या लेखणीला आवर घालतां येत नाही. या कादंबरींत घटनांची इतकी विलक्षण गर्दी झाली आहे की, भुत्या व हत्या या दोघांच्याहि स्वभावदर्शनाचें स्वरूप बरेंचसें धूसर व अस्पष्ट झालेलें आहे. हत्याच्या स्वभावविकासाच्या दृष्टीने कादंबरीकाराने ठळक ठळक प्रसंगांतच रंग भरावयाला पाहिजे होता. नाट्याच्या हौसेमुळे त्यांना संयम राहिलेला नाही व ह्यामुळेच गौण परंतु रंजनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या प्रीतीच्या कथानकाचा त्यांना विसर पडला. वेंडर काकांच्या सिंधूचें सदुकाकांवर असलेलें प्रेम त्यांना महत्त्वाचें वाटलें नाही. गारंबीच्या बापूमध्ये राधा आणि बापू यांचे संवाद जसे त्यांनी वर्णिले व प्रीतीचें कथानक गुंफलें तसें त्यांना या कादंबरींत रेखाटतां आलें असतें व कादंबरीच्या एकंदर आकर्षणांत भर पडली असती. पण अनेक घटनांचे दुवे मधूनच सोडून देण्याची त्यांची पद्धत या कादंबरींत पराकोटीला गेली आहे. सिंधू आणि सदूकाका यांच्यांतील मीलनाची ओढ मनाला चटका लावून सोडते. या कादंबरींत इतके संवाद आहेत की, प्रत्येक घटना नाट्यमय झाली आहे. परंतु या घटनांचीं वर्णनें संवादरूपानें वाचीत असतांना वाचक अस्वस्थ होत नाही, कारण घटनांचा प्रारंभ व शेवट याची पूर्ण कल्पना त्याला आलेली असते. वाचकांना अस्वस्थ करणारे, विचारमग्न करणारे व चीड उत्पन्न करणारे प्रसंग या सपाटवर्णनांमुळे व सरळसोट संवादामुळे फुकट गेलेले आहेत. जीवनांतील बऱ्यावाईट प्रसंगांचें ताटस्थाने वर्णन करणें हीच कलेची कसोटी आहे, अशी समजूत कादंबरीकाराने करून घेतलेली दिसते. स्वतः अनुभवलेल्या सुखदुःखांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाट करून देतांना, जीवनाचें दर्शन घडवून देतांना उत्कटतेची व तीव्रतेची अभिव्यक्ति नसेल तर या जीवनदर्शनाचा परिणाम फिकट होतो.

दुर्गेश्वराच्या हद्दीवर असलेल्या, करवंद्याच्या कातळावर प्रेम करणाऱ्या गरीब हत्याच्या बालपणाची ही कथा अत्यंत मनोरंजक आहे यांत शंकाच नाही.

नीहार

(कवयित्री—पद्मा; प्रकाशक—मौज प्रकाशन, मुंबई ४)

गेल्याच वर्षीची गोष्ट. एका कवि-संमेलनांत पुण्याच्या प्रसिद्ध कवयित्री पद्मा यांच्या कविता ऐकण्याची संधि मला लाभली. पद्मा यांचें नांव मी ऐकलें होतें. 'प्रीतिपथावर' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्याचें मला माहित होतें. पण त्यांचें काव्य माझ्या वाचनांत आलेलें नव्हतें. त्या रात्रीं पद्मांनी स्वतःची 'मी माणूस' ही कविता म्हटली.

स्त्री सुंदर चलनी हुंडी
स्त्री म्हणजे नुसती कुंडी
स्त्री म्हणजे केवळ मांस

आणि

नाही मी हो नुसती नार
पेजेसाठी जी लाचार
शेजेसाठी आसुसणार
नाही मी नुसती मादी
मी माणूस–माणूस आधी

या काव्यपंक्तींमुळे ही कवयित्री तथाकथित नवकाव्याची पुरस्कर्ती असावी असा माझा ग्रह झाला. कारण या कवितेंतील आशय साधा असून अभिव्यक्तीहि सरळसोट, गद्यप्राय पद्धतीने झालेली आहे. त्यांनी इतरहि कविता म्हटल्या, पण त्यांची 'आई झाल्यावर' ही कविता मात्र माझ्या मनांत घोळत राहिली.

आतां कळतो ग आई। अर्थ तुझ्या वेदनांचा
आणि हळव्या सुखांचा। दुखांचाही ॥
आता तुझें वेडें मन। भाग्यें मलाहि लाभलें
आणि पूर्णत्व पावलें। जीवन हें ॥

स्त्रीसुलभ भावना साध्या पद्धतीने काव्यांत मांडण्याची त्यांची शैली अनुपम आहे. त्या कविसंमेलनानंतर आज त्यांची कविता संग्रहरूपाने मी वाचली. प्रथमश्रवणीं उत्पन्न झालेला माझा ग्रह दूर झाला आणि त्यांच्या साध्या काव्याचें वैशिष्ट्य मला पटलें. या साध्या, सरळ, कवितेचें अव्याजमनोहर स्वरूप कोणाहि रसिकाला आवडेल. पद्माबाईंची कविता कांही कवितांचा अपवाद सोडल्यास नवकाव्यापासून फार दूर आहे. 'मी माणूस' सारखी त्यांची कविता जुन्याच संप्रदायाची आहे. पद्माबाईंच्या कवितांचा वेगळेपणा त्यांच्या साध्या भावनांच्या सहज आविष्कारांत आहे. स्त्रीसुलभ प्रीति, वात्सल्य, कौटुंबिक सुखसंवाद त्यांच्या कवितांत चित्रित झाला आहे. स्त्रीहृदयाची आर्तता त्यांच्या कवनांत प्रकट झालेली आहे. जुन्या शिष्टमान्य वाङ्मयीन संकेतांनी त्यांचें काव्य अलंकृत झालेलें आहे. अलिकडील मराठी काव्याचाहि सखोल परिणाम त्यांच्या रचनेवर झालेला आहे. आणि असें असूनसुद्धा त्यांच्या काव्यांत एक विलोभनीय वेगळेपणा आहे.

त्यांची वात्सल्यरसाची कविता वाचल्यास त्यांच्या काव्यांतील साध्या अभिव्यक्तीचें सौन्दर्य पटेल. 'आई झाल्यावर', 'असूं दे ग शेजीबाई', 'माझा सुधीर सावळा' या कवितांत प्रगट झालेला वत्सलभाव निरागस आणि मधुर वाटतो. 'मी माणूस, मी माणूस आधी' असा घोष करणारी स्त्री, 'स्त्री देवी हें तर खोटं, स्त्री सखी हेंहि खोटं' असा तडफडाट क्वचित् करीत असतांना दिसते. बाकी त्यांच्या कवनांतील स्त्री खरोखरची रक्तामांसाची स्त्री वाटते. स्त्रीसुलभ भावना हळुवारपणे चित्रित केल्या आहेत. साधी सरळ प्रणयगीतें, कौटुंबिक प्रेमाची सोज्वळ गीतें त्यांनी रचिलीं आहेत. त्यांची प्रेमगीते आत्मपर आहेत. त्यांतील प्रणयहि साधा आहे. त्यांत व्यथितप्रेमाची तीव्रता, भग्नाश प्रेमाची उत्कटता अगर उपेक्षित प्रेमाची दाहकता प्रत्ययास येत नाही; तर प्रीतीची परिपूर्तता अनुभवास येते. 'नाही जायचें अशाने', 'याच कांही क्षणांसाठी', 'विडा', 'ये अवचित नवजीवन', 'माहेरासी जावयाचें', 'आज बाहेरचं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

जावें वाटेना' इत्यादि कवितांत प्रीतिसाफल्याचें संगीत आहे. ललित नादमधुर शब्दकलेने हीं गीतें सरसरमणीय झालेलीं आहेत. प्रेमाच्या कल्पनेवर कवयित्री इतकी लुब्ध आहे की, तिच्या काव्याचा प्रेम हा स्थायी स्वर झालेला आहे. कांही रूढ संकेताने परिपूर्ण असलेल्या 'विरहिणी', 'अनुभविसी कां कधी', 'रे तूं फसवा' या कविता वगळल्यास प्रेमपूर्तीची कविता मोठ्या उत्साहाने तिने गायिली आहे—

आज मला ये अवचित नवजीवन
प्रीति मनीं ये बहरून चिरसुंदर चिरनवीन
ये उकळीवर उकळी
मनगात्रें रसरसलीं
खळखळतें हृदयांतून हें अमृत, हें यौवन !

तसेंच

आज पुन्हा अंगोपांगी सोनचांफा बहरला
पुन्हा बाई श्वासोश्वासीं धुंद मोगरा फुलला

आणि

घरांत भरला कुणाचा भास
उन्मत्त श्वास
मंद सुवास
ध्यासांतून धुंद मन उठेना
आज बाहेरच जावें वाटेना

आज या घराची माया ओढते
जिवा जडते
पाया वेढिते
अदृश्य आकुल मिठी सुटेना

असा प्रणयपूर्तीचा, सोज्वळ समाधानाचा उद्गार आहे. स्वतःच्या सुखांत धुंद झालेल्या प्रेयसीचा विशुद्ध आनंद आहे. या प्रणयपूर्तीमुळेच निसर्गाच्या चित्रणांतहि प्रणयच्छटा रंगविलेल्या आढळतात. 'येसी वसंत-पाऊलीं', 'अचानक उजळोत', 'येतो पाऊस', 'करीत लवलव', 'आषाढ' या कवितांतील निसर्गाच्या शब्दचित्रांत प्रणयाचा सूर खालच्या लयींत सारखा चलेला आहे. 'आषाढ' या कवितेंत—

चिरप्रणयी आषाढ तूं
अन् शाश्वत यौवना धरित्रीच मी !

अथवा

तुझ्या नि माझ्या प्रणयामध्ये आषाढ धरेचें
तेंच सामर्थ्य

प्रीतीच्या त्याच अनावर, भव्य वादळी
वर्षावीं धुंद व्हायचें !

असला प्रीतिभावनेचा आविष्कार केलेला आहे. विरहाची तशीच मीलनाची, मुग्ध शृंगाराची तशीच उन्मादक अभिसाराची कविता त्यांनी लिहिलेली आहे. 'त्या तसल्या सायंकाळीं' या कवितेंत मादक अभिसाराचें वर्णन मोठें हृद्य आहे.

त्या तसल्या सायंकाळीं
—ती वेळच तसली—

जी उटी ओलसर मोगरिच्या गंधाची त्याली
पिउनी वसंतवारा मादक अभिसारास्तव सजली

त्या भिजल्या कातरवेळीं
मी नेसुनि वसन अबोली

वासंतिक गौरीचें लावुनी हळदीकुंकू भाळीं
करांत गजरा मोगरिचा अन् हिनागंध भंवतालीं

या उन्मादक अभिसाराप्रमाणेच

माझ्या भोळ्या खुळ्या जीवा
रंग हिरवा सरला
उष्ण मातीचा केवळ
रंग करडा भरला

माझ्या भोळ्या खुळ्या जीवा
गंध मातीचा सरला
आता उष्ण राख सारी
कसें समजावूं तुला ?

अशी निर्भीड कविता त्यांनी लिहिली आहे. नवथर शृंगाराचें स्पष्ट चित्रण त्यांनी केलें आहे. पद्माबाईंची पुष्कळशी रचना इतर कवींची कविता वाचून प्रस्फुरित झालेली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अलकांतुन, पुलकांतुन
अधरांतुन, रुधिरांतुन
झुमझुमती, थयथयती हे मंजुळ रतिपंजण

अथवा

मुलुखाचें हें हटेल
मद्यपीच अन् छटेल
क्षण विटेल, क्षण नटेल
मन माझें--

या ओळी आणि 'स्वप्नांत आज मी बावरतें', 'येतो पाऊस', 'करीत लवलव' या कविता वाचल्यास त्यांच्या काव्यरचनेवर तांबे, बोरकर आणि पाडगांवकर या सौंदर्यवादी कवींचा प्रभाव पडलेला दिसतो. मात्र अनुभूतींची कृश कमाई, व भावाविष्काराचें तोकडें सामर्थ्य ठायीं ठायीं रसिकांच्या प्रत्ययास येतें. तरल संवेदनाचा आविष्कार व उत्कट अभिव्यक्ति कवयित्रीला न जमल्यामुळे या काव्यरचनेंत कांहीतरी कमी आहे असें वाटतें. असें असलें तरी या 'नीहार'पातानें मराठी काव्यवाटिका सुभग होणार आहे यांत शंकाच नाही.

—पां. ब. गाडगीळ

मुक्ति

लेखक—पु. भा. भावे; प्रकाशक—कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणें २; मूल्य तीन रुपये.)

सुप्रसिद्ध कथालेखक श्री. पु. भा. भावे यांच्या निवडक आठ कथांचा हा संग्रह आहे. आजच्या मराठी कथालेखकांत श्री. भावे यांचे स्थान अनन्यसामान्य आहे, ही गोष्ट नव्याने सांगावयाची आवश्यकता नाही. भाषेचें सौष्ठव, कल्पनेचें वैशिष्टय, सूक्ष्म अवलोकन, चिंतनशील दृष्टिकोन यांमुळे श्री भावे यांच्या कथांचें वेगळेपण ठळकपणे जाणवतें. उत्कटता हा भावे यांच्या ललित लेखनाचा गुणविशेष आहे. 'पस्तीशी'तला उद्दंड श्रृंगार चित्रित करतांना त्यांच्या भाषेचा विलासयुक्त विभ्रम व फुलोरा दृष्टीस पडतो, तर मृत्यूच्या भयानक व दारुण चित्रणांत तीच भाषा भीषणतेचें व प्रखरतेचें आवरण घेऊन प्रगट होते, नैराश्याच्या व कारुण्याच्या प्रकाशनांतहि त्या भाषेचें स्वरूप सार्द्र व सानुराग होत जातें. याच उत्कटतेच्या व भाषाप्रभुत्वाच्या गुणावर श्री. भावे यांनी आपल्या कथांतील वातावरण जिवंत केलेलें आहे.

या संग्रहांतील 'मुक्ति' ही कथा थोडीशी वैशिष्टय-पूर्ण आहे. लेखकाच्या अपार्थिव कल्पनाविलासाचा व समृद्ध भाषेचा नेत्रदीपक विलास या कथेंत पहावयास सापडतो. स्वातंत्र्यासाठी बलिदान करणाऱ्या एका देश-भक्ताच्या वासनामय सूक्ष्म शरीराचें अनंत अवकाशां-तील परिभ्रमण यांत दाखविलेलें आहे. देशाच्या उन्नतीसाठी तळमळणाऱ्या त्या त्यागी जीवात्म्याची अशांत व मोहबद्ध धडपड त्याला मुक्तीच्या, सायुज्यतेच्या दारांपासून ओढून आणते. ह्या धडपडींत त्याचे कांही क्षण खर्च होतात. पण विश्वाच्या मानदंडाने हे क्षण म्हणजे पृथ्वीवरील सहस्रावधि वर्षे असतात. या सहस्रावधि वर्षांच्या अवकाशांत त्याच्या आवडत्या भारतांत किती उद्वेगजनक उत्पात झालेले असतात, त्याचा देश किती बदललेला असतो याचें अत्यंत सरस चित्रण या कथेंत घडते. विश्वाच्या मानकल्पनेंत भूखंडांचें अस्तित्व किती नगण्य आहे व कालाच्या आणि अवकाशाच्या अनंतत्वाची पृथ्वीवरील कल्पना किती सापेक्ष आहे याचें चिंतनरम्य चित्रण या कथेंत केलेलें आहे. चिंतनशील तत्वज्ञानाच्या भूमिकेवरून लिहिलेली या संग्रहांतील पहिलीच कथा मनाला स्तिमित करणारी, वेड लावणारी आहे.

या कथासंग्रहांतील सर्वच कथांतून लेखकाचा जीवनाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोण प्रगट होतो. ह्या कथांतून एक सूत्र अनुस्यूत झालेलें दिसतें. या संग्रहांतील कथांतून मृत्यूची गूढ चाहूल स्पष्टपणें ऐकू येते; किंबहुना प्रेम आणि मरण, भोग व त्याग या परस्परविरोधी भावनांच्या संमिश्रतेवरच जीवनाचें साफल्य अधिष्ठित आहे असा लेखकाचा विश्वास प्रगट होतांना दिसतो. त्यामुळे भोगाच्या आस्वादानंतर व उपशमानंतर उत्पन्न होणारी तृप्तीची व विरागाची छटा या संग्रहांत पडलेली दिसते. मृत्यूची अनामिक व आर्त चाहूल लागल्यानंतर येणाऱ्या मूकतेचें, चिंतनाचें व विरागाचें प्रतिबिंब प्रत्येक कथेंत पडलेलें दिसतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'ठरीव ठशाची गोष्ट' या कथेंतील मृत्यूसाठी धडपड-णारा म्हातारा व त्याला जगविण्याची धडपड करणारा लहान मुलगा, विद्याधराची वही या कथेंतील वहींतील कल्पनांच्या जिवंतपणामुळे बेचैन होणारा व स्वतःच्या मृत्यूआधी त्या कल्पनांचा विनाश करणारा विद्याधर, आरशी मधील मृत्यूची झापड डोळयांवर पडूं लागल्या-च्या जाणिवेने "To the Nunnery you go and quickly go" ह्या शेक्सपीअरच्या ओळी गुणगुणणारे बळवंतराव, आयुष्यांत महामूर्ख व व्यवहार-शून्य गणल्या गेलेल्या विनायकरावांचा मृत्यूने क्षणा-धांत केलेला कायापालट, कावळघांची गोष्ट ह्या कथेंतील अकारण व आकस्मिक उत्पत्तीचा व निर्दय विनाशाचा इतिहास, या सर्वच कथांतून लेखकाच्या मृत्यूविषयीच्या वेगवेगळया कल्पना दृग्गोचर होतात. सर्वच कथांतून जीवनांतील वैय्यर्थ्याचा सूक्ष्म प्रवाह वाहतांना दिसतो, लेखकाच्या आयुष्यांतील भोग-विरागाची सूचकता प्रतिबिंबित झालेली दिसते.

शृंगाराचा उन्माद, प्रेमाचें काव्य, मृत्यूचें रौद्र-गंभीर स्वरूप, जीवनोत्साहाची बेहोषी, वैफल्याचें कारुण्य, त्यागाचें माहात्म्य, आपल्या ललितलेखनांत उत्कटतेने चित्रित करणारा हा अभिजात कथाकार जीवनाचें आजचें स्वरूप वर्णन करण्यांत कसा मागे राहील? सामाजिक आशयाचा आणि वास्तवतेचा टेंभा मिरवणारे मराठी कथाकार व कादंबरीकार जें वाता-वरण निर्माण करूं शकत नाहीत व जीवनाचें चित्र रेखाटूं शकत नाहीत तें, भावे यांनी कोणच्याही वाङ्‌म-यीन मूल्यांचा वडेजाव न करतां, आपल्या तीव्र उत्कटतेने व तळमळीने करून दाखविलें आहे. एखाद्या बेडेकराला गोखल्यांच्या 'मंजुळे'तच फक्त सामाजिक आशय गवसतो, व तो त्या लघुकथेवर विस्तृत भाष्य करतो. परंतु गोखल्यांपेक्षा अनेकपट सुंदर, सखोल व जीवनविषयक गंभीर दृष्टिकोनाने लिहिलेल्या भाव्यांच्या कथांत मात्र या तथाकथित 'पुरोगामी' टीकाकाराला वास्तवता आणि सामाजिक आशय आढळत नाही. 'फाटलेलें आकाश' या कथेंत आजच्या सामाजिक जीवनाचें भेसुर, विदारक, संशयग्रस्त स्वरूप चित्रित केलें आहे. समाजांत विसणारा ढोंगीपणा परस्परा-विषयींचा अविश्वास, सभ्यतेच्या आवरणांत दडलेली हिडीस श्वापवृत्ति, परस्परविषयक शत्रुत्वाची अकारण भावना, त्यांतून निर्माण होणारा निर्दय सावधपणा, गडबड, धावपळ, गोंगाट या सर्व भावनांचें वास्तव स्वरूप या कथेंत आविष्कृत केलेलें आहे. आजच्या सामाजिक जीवनाचें सूक्ष्म अवलोकन, अनुभूतीची संपन्नता, मानवी स्वभावाचें अचूक ज्ञान व अंतरींची तळमळ या गुणांमुळे ही कथा मराठींतील कथावाङ्‌म-यांत अग्रगण्य ठरेल. भावे यांच्या सामर्थ्यशील, प्रभावी लेखणीचा साक्षात्कार घडविण्यास ही एकच कथा पुरे आहे.

—म. वा. वैद्य

शीळ

(ना. घ. देशपांडे; प्रकाशक—मौज प्रकाशन, मुंबई ४)

शब्दअर्थाची एकात्मकता श्री. ना. घ. देशपांडे ह्यांच्या कवितांतून उत्कृष्टपणें व्यक्त होत असते. भावानुकूल वातावरण अति सहजपणें त्यांना निर्माण करतां येतें 'ज हासली—सजणे सांज हासली—विसावली परस्परांत ...नसावली' ह्या ओळींतील परस्परविसावा किती मनोज्ञ आहे! 'ढगांत होती सांज पांगली' आणि 'ढवळी ढवळी बघ बगळयांची संथ भरारी ग' ही सांजच्या नदीकिनारींची वातावरणनिर्मिति किती सहजपणें साधली आहे. 'या माथ्यावरती ठळक चांदण्या नऊ' ह्या अस्ताईच्या प्रथम ललकारीनेच धनगरी गाणें भरून गेल्यासारखें वाटतें. शब्द अर्थांच्या एकात्मकतेमुळें देशपांड्यांच्या कवितेला कमालीची वेधकता प्राप्त झाली आहे.

देशपांड्यांच्या आंतरिक जीवनांत दोन भाव-विश्वें आढळतात. संवेदनशील अंतःकरणावर दारुण आघातांच्या संस्कारांनी घडलेलें असें एक आणि दुसरें व्यक्तिगत शोकाच्या आवेगाच्या अतीत झालेलें कला-पूर्ण, काव्यात्म, मनाच्या मुशींतून निर्माण झालेलें, अतएव चिरंजीव, नवयौवनाने नटलेलें असें प्रतिमा-संपन्न भावविश्व. तीं परस्परांना छेदित नाहीत. त्यामुळे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुःखमय–दारुणविकल अनुभव असा व्यक्त होतो. ‘फसलें जीवन, आता नुसतें-नुसतें मरण उरलें रे !’ आणि जेथे–‘झडलीं पानें–पुष्पें पहिलीं–काटयांची खाईच राहिली.’ असें हें जीवन. जेथे पुनः––‘जावा भास जुना म्हणून फिरलों–तो होत नाही कमी आणि जेथला अदय अनुभव हाच एक दिसतो, ‘यातना दुःखांतली अन् चेतना गेली सुखाची–झाकल्या नेत्रांत आता अश्रुबिंदू गोठले ग’ पण ह्याच कटु अनुभवाच्या सान्निध्यांत त्यांनी स्वतःचें वेगळें मनोमय जग निर्मिलेलें आहे. तेथे ‘मालन’च्या प्रीतींतला रानराणीचा भोळा शृंगार उकलतो. ‘मी सुखांत घालूं हात कुणाच्या गळां–राहिलों इथे, पण नाही लागला कुणाचा लळा’ हा वैताग स्पष्ट होतो. ‘व्याकूळ करंटया माझ्या गततेज जिवाला–पाहून पुराणे प्रेमी विटलेत विटूं दे’ ही जाणीव बाजूला राहते. ‘आता कशी पुरावी भाषा अशी परावी–निःशब्द जीवनाला वाचा कधी फुटावी.’ हा संदेह निर्माणच होत नाही; आणि ‘स्वच्छ माझ्या अंगणींची केळ. हाले राजसा–रंग हीचा गोर आहे केळपानाचा जसा’ ही कोवळीक; ‘चित्त मऊ माझें जशी रानकाळी–धुंद तुझी आहे नदी पावसाळी’ ही प्रतीति प्रकट होते. कुठे–‘अंगावर नवती कळा–उरावर उडवित आली सरी’ हें चित्रदर्शन, तर कुठे ‘हलताच हात वाजते गोठबांगडी–लावून जीव नेसते कि हिरवी चिडी’ हें चित्रित झालेलें आढळतें; आणि त्याच भावविश्वांत ‘उगिच हासतें माझें ललित अंतरंग सख्या–उमलत्या फुलामधले हालले पराग सख्या’ असें लालित्य सहज उमलून जातें. तेथे–‘चल भेट निमिषभर–चंद्रमुखी’ ही साद घालतां येते. ‘ही खाली हिरवळ ओली, कुजबुजून बोलूं बोली, तिमिराची मोजूं खोली रे, थांव जरासा’ ही गळ घालतां येते. स्वप्नतरल वातावरणांत अनंत जीवनधागे ‘तुझ्या लोचनीं’ गुंतले जातात. चंद्रकोर शुद्धांत जशी तशी प्रीत वाढते. आणि एक प्रकारें त्या स्वप्निल वातावरणांतूनच ‘सजणी’ दंवभरल्या धुक्यांतून उदयास येऊं लागते. मनाच्या मुशींतून अशा प्रकारें सजणी निर्माण झाल्यावर सजण आणि सजणी ह्या भूमिकाच तेथे बदलल्या जातात. तेथे सजणापेक्षा सजणी धीट कां ह्या प्रश्नाचें प्रयोजन नसावें. तेथें उत्कटता आहे, धिटाई आहे, निरागसता आहे, कोवळीक आहे. असें हें कवीच्या अंतःकरणांत वसलेलें हें भावात्मक विश्व आपल्याच नादांत रंगलेलें आहे.

“हें माघामधलंऽ हीव, थरकतें अंग; हुरहूर वाटते, कुणीच नाही संग.” “वाट अशी खडकाळ, सख्या रे, रात अशी अवकाळ, मी आलें लडिवाळ, सख्या, तूं कर माझा प्रतिपाळ.” “काय बाई तरी, चंद्र आला वरी, चाल सजणा घरीं, ऐक. झालें सख्या, चंद्रमुख हासरें वाटतें लाजरें.” “ओला झाला पदर, साडी चोळी सदर, दगा दिला ह्या दुस्मानानं, त्याला नाही कदर.” अशा प्रकारें जेथें माघामधलं हीव अतृप्त हुरहुर निर्माण करतं, चंद्रबिंबाचीहि लाज वाटते, तूं प्रतिपाळ हा विश्वास पुरेसा होतो, आणि कुणा अभिसारिकेने केल्यागत पर्जन्याचा निषेव खास वऱ्हाडी बोलींतून व्यक्त होतो. जगापासून दूर अशा विजनांत हें विश्व थाटलें आहे. कवीच्या अंतःकरणांतील साद आणि निसर्गाचा पडसाद ह्यांच्यांत ह्या विश्वांत अभेद आहे इतके ते एकमेकांत जुळून गेलेले आहेत. हालाच्या सप्तशतींतील ग्रामीण गीतांची गोडी या गीतांत उत्कटत्वाने प्रत्ययास येते. शेतकरी कातकरी ह्यांच्या जीवनांतलें निसर्गसान्निध्य त्यांत रसरसलेलें आढळतें. त्यामुळे त्यांचा गंध किती तरी काळ दरवळत असल्यागत वाटत राहतें. माधव जलियन् किंवा तांबे यांचा अनुकार मुळीच उमटला नाही असें नाही.

या काव्यसंग्रहाला प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांची प्रस्तावना जोडलेली आहे. देशपांड्यांची कविता निमित्तमात्र करून ‘त्या कांही कवींच्या’ तथाकथित वैगुण्यावर छिद्रान्वेषी कोपरखळ्या देण्याची कांही आवश्यकता नव्हती. या प्रस्तावनेमुळे देशपांड्यांना अन्याय झालेला आहे. देशपांड्यांच्या काव्याला सवंग दलालीची कांही जरूरी नाही, कारण तें स्वयंप्रभ खासच आहे. ही प्रस्तावना वाचून यापुढे साहित्यांतील फुकट फौजदार व दलाल यांच्या उर्जितावस्थेचा काळ येणार आहे असें वाटूं लागतें.

—मा. नी. गलगलीकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तलावांतलें चांदणें

(लेखक—गंगाधर गाडगीळ; प्रकाशक—लाखाणी बुक डेपो, मुंबई ४)

श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या लघुकथांचा हा आठवा संग्रह. गाडगीळ हे आजचे आघाडीवरील एक कथालेखक आहेत. गाडगीळांना तंत्राची फारशी मातब्बरी वाटत नाही. चमत्कृतिपूर्ण घटना, वैचित्र्यपूर्ण प्रसंग अथवा नमुनेदार स्वभावचित्रण या लघुकथेच्या तंत्रमंत्राच्या ठोकताळ्यांत गाडगीळांची कथा अडकलेली नाही. लघुकथेला गतिमान करण्याचें कसब गाडगीळांना साधलें आहे. कथेचें एकसंस्कारित्व व एकपरिणामत्व साधावें हें गाडगीळांचें उद्दिष्ट नसतें. त्यांच्या कथेचा ओघ धावता व प्रवाही वाटतो. त्यांच्या कथेचा विकास आणि परिणति वास्तवपूर्ण व अकृत्रिम वाटते.

गाडगीळांच्या कथानिर्मितीची प्रक्रिया संज्ञाप्रवाह पद्धतीशीं मिळतीजुळती आहे. त्यांच्या कथेंतील मनस्वीपणा इतका पराकोटीला पोचला असतो की त्यांच्या ठिकाणीं बुद्धिपराङ्मुखता (Retreat from Reason) आलेली आहे काय असें वाटूं लागतें. मानवी जीवनाच्या विषयी तुच्छतेची व विफलतेची भावना गाडगीळांच्या कथांतून तीव्रपणें व्यक्त होते. गाडगीळांचा आत्यंतिक व्यक्तिवाद त्यांच्या कथांत प्रगट होतो.

"तलावांतलें चांदणें" या संग्रहांत एकूण बारा कथांचा अंतर्भाव झालेला आहे. 'सरळ रेषा' या कथेंतील म्हसकर मास्तरांची व्यक्तिरेखा प्रातिनिधिक व नमुनेदार वाटते. गाडगीळांचें व्यक्तिचित्रणाचें असामान्य कौशल्य या कथेंत प्रामुख्याने डोळ्यांत भरतें. स्वभावरेखेचीं दुसरीं सुंदर उदाहरणें म्हणजे 'आंधळें दळण' या कथेंतील आजीचें व 'अखेरचें सांगणें' या कथेंतील जानकीबाईचें होय. जुन्या पिढींतील कथाकार स्वभावरेखाटनाला प्राधान्य देत असत. नवकथेचे अध्वर्यु गाडगीळ हे देखील स्वभावचित्रणाच्या बाबतींत मागे नाहीत हें या व्यक्तिचित्रांवरून स्पष्ट होतें. 'हरवलेले दुवे' 'भागलेला चांदोबा' 'गढूळ पाणी' या कथा गाडगीळांच्या धर्तीच्या (type) वाटतात. ऑफिसच्या रटाळ-rotten-वातावरणांत मरगळीला आलेला किशोर नांवाचा कारकून हा 'हरवलेले दुवे' या कथेचा नायक आहे. मध्यमवर्गीयांच्या जीवनांतील उबग या कथेंतून चित्रित केलेली आहे. 'भागलेला चांदोबा' या कथेंतील नायिका ही देखील विफलतेच्या दुबळ्या भावनेनें झपाटली आहे. आपण विधवा झालों असतों तर आपणहि या नर्सप्रमाणे ऐटबाज आणि सुखदायक जीवन जगलों असतों हा चमत्कारिक व भयंकर विचारहि तिच्या मनाला स्पर्शून जातो.

'सुत्रा' 'खेळण्यांची कहाणी' या कथा म्हणजे शब्दचित्रेंच वाटतात. 'खेळण्यांची कहाणी' या कथेंतील गाडगीळांनी कल्पकतेच्या किमयेने लिहिलेला लाकडी खेळण्यांचा इतिहासहि रंजकतापूर्ण वाटतो. 'माणूस, परी आणि कासव' ही रूपककथा वाटावी अशी तिची रचना आहे.

'तलावांतलें चांदणें' ही कथा नितांत सुंदर आहे. गाडगीळांच्या कथेंतील भाषेचा डौल आणि घाट मनोवेधक आहे. त्यांच्या कथांत तळपत्या प्रतिमांची पखरण आहे. निवेदनापेक्षा सूचकतेवर त्यांचा कटाक्ष आहे. अव्यक्ताचा व्याप इतका मोठा आहे की कितीहि आशय ओतला तरी तो अपुरा वाटावा. त्यांच्या कथांचें वाचन करीत असतांना मधून मधून कांही सुंदर वाक्यपंक्ती मन आकृष्ट करितात. "शब्दांच्या फुलपाखरांचे पंख तुझ्या उपस्थितीच्या स्पर्शानें गळून पडले असते." "गर्भवतीच्या जपून टाकलेल्या पावलांसारखी वाऱ्याची हालचाल होत आहे." "किशोरने आपल्या दुबळ्या स्वप्नांना इंग्रजीचें टॉनिक दिलें." "संध्याकाळचा पिवळा आजारी प्रकाश निश्चित पडला होता." "सराईत वेश्येप्रमाणे विजयने सवय म्हणून डोळा मोडला." इत्यादि.

गाडगीळांच्या या कथांतून "हसायचो," "रडायचो" "कातावयाचो' हे कोकणी शब्दप्रयोग खित्य वाटतात.

—म. प्र. मोहरीर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यिकांचा पत्रव्यवहार

सिताबर्डी नागपूर
ता. १७-३-५५

संपादक, 'युगवाणी' यांस सप्रेम नमस्कार वि. वि.

वाशिमचे कवि व लेखक श्री. व. चिं. सोमण यांच्या 'झिमझिम' व 'गुंजा' या कवितासंग्रहांकडे आपल्या वाचकांचें लक्ष वेधण्यासाठी हें पत्र मुद्दाम लिहीत आहें.

असें पत्र लिहिण्याचा प्रसंग यावा हेंहि एका प्रकारें फार शोचनीय आहे. कारण माझ्या अल्पमती-प्रमाणे 'झिमझिम' व 'गुंजा' यांत पहिल्या प्रतीचें काव्य फार मोठ्या प्रमाणांत आहे. परंतु आजकाल पहिल्या प्रतीचें लेखन करण्यापेक्षा पहिल्याप्रतीची प्रसिद्धि करवून घेणेंच फार महत्त्वाचें होऊन बसलें आहे. लेखकांचे व टीकाकारांचे गट उत्पन्न झाले आहेत. श्री. वि. के. बेडेकरांसारखा शहाजोग समजला जाणारा टीकाकार शरच्चंद्र मुक्तिबोधांचे पंक्तींत अमरशेखला लीलेने बसवून टाकतो. एक सामान्य पोवाडेगायक व एक चांगला कवि, एकाच मापाने मोजले जातात. याला पक्षांधता व उथळपणा म्हणावयाचें नाही तर दुसरें काय ? आणि या बेडेकरांचा मोठे समतोल व गाढे टीकाकार म्हणून गाजावाजा करविण्यांत आला आहे. वस्तुतः ते ज्ञानेश्वरांनंतर एकदम अमरशेख व अण्णाभाऊ साठेवर उडी मारणाऱ्या डांग्यांच्याच उथळ व आंधळ्या पंथांतले आहेत. श्री. पां. ब. गाडगीळां-सारखे व्यासंगी व मार्मिक टीकाकारच तेवढे बेडेकरां-च्या. साळसूद सोंगाने व पक्षदूषित टीकावृत्तीने फसले नाहीत. एरवीं ही अरसिक व आंधळी गटबाजी आज मराठी साहित्यांत मोकाट सुटली आहे. दरदिवशीं नवा "युगप्रवर्तक" निर्माण करणाऱ्या या गटबाजीला सोमणांचे काव्यगुण सापडणें कठीण आहे. 'मौजे'च्या समीक्षकाला तसे ते सापडले नाहीतच. तुच्छतेने बर-बटलेल्या पांचदहा ओळींतच या टीकाकाराने 'गुंजांची' बोळवण केली आहे. तुटक्या व बुळबुळीत वाक्यांतून प्रकट होणारा मठ्ठपणा हा "मौजे"च्या समीक्षणांचा फार वेळां विशेष असतो. हा मठ्ठपणा अर्थातच प्रामा-णिक मतभेदांच्या नांवावर खपविण्याची सोय आहे. परंतु 'मौजे'चें टीकालेखन अनेकदा अतिशय संशयास्पद जातीचें असतें हें प्रभाकर पत्कीचें "सुपर्ण"'तील (मार्च ५५) पत्र वाचणाऱ्या कुणाच्याहि ध्यानांत येईल.

अशा परिस्थितींत वाशिमच्या विजनवासांत राहणाऱ्या व. चिं. सोमणांच्या काव्यगुणांकडे मी आपल्या वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. आजकालचे "नवकवी" केवळ काव्यगायनावर व हातवाऱ्यांवर भाव खाऊन आहेत. सोमण आपल्या कविता गात नाहीत. ते केवळ चांगल्या कविता लिहितात. त्यांचा एखादा गट नाही. ते स्वतःला युगप्रवर्तक म्हणवीत नाहीत. अथवा दुसरे कोणी त्यांना तो किताब बहाल करूं इच्छित नाही. अस्वस्थ प्रकृतीने पीडलेले रसिक सोमण प्रसिद्धीविषयी पूर्णपणे उदासीन आहेत. आणि गटबाजीने ग्रासलेले टीकाकारहि त्यांचेविषयी उदासी-नच राहूं इच्छितात. चांगला टीकाकार हा जवळजवळ चांगल्या लेखकाइतकाच दुर्मिळ असतो. परंतु आज साहित्यप्रांतांत साधा प्रामाणिकपणाहि सापडणें कठीण झालें आहे. श्री. पु. य. देशपांडे यांनी "साहित्य व समाजजीवन"सारख्या पुस्तकाचा निस्पृह परामर्ष घेणारे टीकालेख लिहिले होते. तसे टीकालेख लिहिणारे टीकाकार आता निर्माण व्हावयास पाहिजेत. एरवीं वाङ्मयांतील आंधळ्या गटबाजीचें व पक्षांधतेचें थैमान थांबणें कठीण दिसतें. कळावें.

आपला

पु. भा. भावे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. संपादक 'युगवाणी'

नागपूर यांसी स. न. वि. वि.

...'विक्रमस्मृति'मधल्या अवतरणासंबंधी माझे नजरचुकीने संदर्भच्युति झाली आहे. डॉ. कुर्तकोटींचें मत शेवटीं दिलेल्या अभिप्रायांत अंतर्भूत नसून त्यांनी प्रारंभीं दिलेल्या प्रस्तावनेंत आहे. (वि. स्मृ. प्रस्तावना पृ. ३) आणि नागपूर युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरु कै. नानासाहेब केदारांचें मत म्हणून मी जें दिलें आहे तें त्यांचें नसून त्यावेळचे (सं. २००२) उपकुलगुरु श्री. वा. रा. पुराणिक यांचें मत आहे. या वादांतील पक्ष-प्रतिपक्षांची संपूर्ण माहिती या संग्रहांत निरनिराळ्या विद्वानांच्या निबंधांत ग्रथित केली आहे. त्यांत श्री. शेंबवणेकर यांच्या लेखास अग्रस्थान दिलें गेलें हें उचितच आहे. (पृ. ५४९) या संदर्भच्युतीबद्दल वाचकांनी क्षमा करावी.

आपला

कृ. मो. शेंबवणेकर

३१५ ठाकुरद्वार, मुंबई

१६–२–५५

विदर्भ साहित्य संघ

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (अ) प्रमाणे वि. सा. संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २४–४–५५ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां केन्द्रीय कार्यालयांत भरेल.

सभेपुढील विषय

१. मागील सभेचा अहवाल.
२. गतवर्षीचें कार्यवृत्त.
३. गतवर्षीचे हिशेब व पुढील सालाचें अंदाजपत्रक.
४. अधिकृत हिशेब तपासनीसांची नेमणूक.
५. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

विशेष सूचनाः-वरील सभा गणपूर्तीच्या अभावीं स्थगित झाल्यास तीच सभा, त्याच दिवशीं, त्याच जागीं सायंकाळीं ५–३० वाजतां भरेल.

दि. १–४–५५
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.

ल. वि. पांढरीपांडे
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या जुन्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. १३-३-५५ रोजीं सकाळीं ८ वाजतां संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली.

प्रथम सरचिटणिसांनी दि. ३०-१-५५ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

नंतर सरचिटणिसांनी १९५४-५५ सालचें कार्यवृत्त सभेला सादर केलें व तें संमत झालें. त्यानंतर सरचिटणिसांनी १ एप्रिल १९५४ ते फेब्रुवारी १९५५ अखेर पर्यंतचा जमा खर्च सभेला सादर केला, आणि मग १९५५-५६ सालचें अंदाजपत्रक सभेपुढे ठेवलें. हें अंदाजपत्रक नवीन कार्यकारी मंडळाच्या सभेला सादर करावें असें ठरलें.

तदनंतर मुदतीच्या ठेवींसंबंधी विचारविनिमय होऊन मुदतीची ठेव म्हणून १००० रु. मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह बँकेंत व तसेंच १००० रु. मध्यप्रदेश हाउसिंग सोसायटीमध्ये ठेव म्हणून ठेवावेत, असें एकमताने ठरलें.

त्यानंतर खालील ठराव सभेपुढे ठेवण्यांत आला. "श्री. ना. रा. शेंडे यांनी गेलीं तीन वर्षे सरचिटणिसाचें कार्य आत्मीयतेने व परिश्रमपूर्वक केलें याबद्दल निवृत्त होत असलेल्या कार्यकारिणीचे सभासद त्यांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद देत आहेत; आणि यापुढे त्यांच्याकडे जरी अधिकारपद नसलें तरी संघाला व कार्यकारिणीला त्यांचें असेंच साहाय्य मिळत राहील, अशी आशा व्यक्त करीत आहेत."

ठराव एकमताने मंजूर झाल्यावर, जुन्या कार्यकारी मंडळाची ही शेवटची सभा संपली.

* *

जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा

जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची संयुक्त सभा रविवार दि. १३ ३-१९५५ रोजीं सकाळीं ९-३० वाजतां संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली. त्यावेळीं जुन्या कार्यकारी मंडळाने घटना नियम १४ (अ प्रमाणे नव्या कार्यकारी मंडळाला अधिकार-प्रदान केलें. जुन्या कार्यकारी मंडळाने केलेल्या भरीव कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून यापुढेहि त्यांनी व सर्वांनी पूर्ण सहकार्य द्यावें, अशी अध्यक्षांनी विनंती केली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर नवीन कार्यकारी मंडळाची कारकीर्द १ एप्रिल १९५५ पासून म्हणजे वि. सा. संघाच्या नवीन वर्षापासून अमलांत यावी असें ठरविण्यांत आलें.

त्यानंतर, नव्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षते-खाली सुरू झाली.

सभेंत सर्वप्रथम घटना नियम ११ (आ) प्रमाणे खालील पदाधिकारी निवडण्यांत आले :

उपाध्यक्ष : श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

कोषाध्यक्ष : प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे

सरचिटणीस : श्री. ल. वि. पांढरीपांडे

चिटणीस : (१) सौ. इंदुमति शेवडे, नागपूर
(२) श्री. तु. ना. काटकर, चांदा
(३) श्री. व. वा. शब्दे, भंडारा

संपादक, 'युगवाणी' : श्री. दि. ब. पंडित

संचालक, परीक्षा समिति : प्रा. पां. कृ. सावळापूरकर

नंतर, 'सांस्कृतिक कार्यक्रम समिती'चे आमंत्रक म्हणून श्री. रा. पु. सगदेव यांची निवड करण्यांत आली.

तदनंतर खालील 'निविदा समिती'ची निवड करण्यांत आली:

सभासद : प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, डॉ. वि. भि. कोलते व डॉ. मा. गो. देशमुख.

आमंत्रक : श्री. ल. वि. पांढरीपांडे

संपादक, 'युगवाणी', संचालक, 'परीक्षा समिति' आणि आमंत्रक, 'सांस्कृतिक कार्यक्रम समिति' यांनी आपापल्या समितींतील सदस्यांची निवड अध्यक्षांच्या संमतीने करावी असा निर्णय घेण्यांत आला.

तसेंच 'गडकरीस्मारक समिति' पूर्वी होती तीच कायम ठेवण्यांत यावी व उरलेल्या समित्यांची निवड कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेंत करण्यांत यावी, असें ठरलें.

नंतर, सरचिटणिसांनी १९५५-५६ सालचें अंदाजपत्रक सभेला सादर केलें.

त्यानंतर, श्री. नानासाहेब जोग यांचें अध्यक्षांना आलेलें दि. २६-२-५५ चें पत्र सभेपुढे विचारार्थ ठेवण्यांत आलें. त्यावर बरीच चर्चा झाल्यावर संपादक 'मराठी जग' यांना पत्राने जाब विचारून आठ दिवसांचे आंत उत्तर मागवावें, असा निर्णय घेण्यांत आल्यावर ही सभा संपली.

* *

लवादाचा निर्णय

१९५५-५६ सालच्या निवडणुकीविरुद्ध आलेल्या श्री शं. ना. सहस्रबुद्धे यांच्या तक्रार अर्जाची रीतसर चौकशी करून, तो तक्रारअर्ज निवडणूकलवाद डॉ. य. खु देशपांडे यांनी फेटाळला.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'श्री. सहस्रबुद्धे यांनी घेतलेले सर्व आक्षेप पुराव्याने सिद्ध झाले नाहीत व सर्व निवडणुका घटनेच्या नियमांना धरून झाल्या आहेत' असें लवादाने आपल्या निर्णयांत म्हटलें आहे.

*   *

युगवाणी : चुकांची दुरुस्ती

'युगवाणी'च्या मार्च ५५ च्या अंकांत कांही ठळक मुद्रणदोष राहून गेले आहेत. मुद्रितें न तपासली जातां नकळत छपाई झाल्याने हे दोष राहिले आहेत. ते वाचकांनी खालीलप्रमाणे दुरुस्त करून वाचण्याची कृपा करावी.

पृ. २३. युगवाणी (एप्रिल १९५५ ते......) ऐवजी युगवाणी (एप्रिल १९५४ ते...... असें वाचावें.

पृष्ठ ३१. खुर्जे अधिवेशनाच्या मजकुरांत ...... श्रीमान् दादासाहेब खापर्डे, आणि पृ. ३२ वर ३ऱ्या ओळींत श्रीमान बाळासाहेब खापर्डे ऐवजीं दोन्ही ठिकाणीं श्रीमान् बाबासाहेब खापर्डे असें वाचावें.

त्याशिवाय आणखी कांही किरकोळ मुद्रणदोष राहून गेले आहेत, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोंत.

—संपादक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सभासदांना व प्रचारकांना सूचना

(१) विदर्भ साहित्य संघाचें नवें वर्ष १ एप्रिल १९५५ पासून सुरू झालें आहे.

(२) जुन्या सभासदांची वार्षिक वर्गणी ३१ मार्च १९५५ रोजीं संपली आहे. तेव्हा सभासदांनी नवीन वर्षाची सभासदत्वाची आपली वर्गणी त्वरित पाठविण्याची कृपा करावी.

(३) जुन्या सभासदांनी नवीन वर्षाची (१९५५–५६ सालासाठी) सभासदत्वाची वर्गणी भरल्याशिवाय त्यांना पुढील अंक मिळणार नाही, म्हणून तसें नम्रपणें सूचित केलें जात आहे.

(४) जे सभासद होतील त्यांनी घटना नियम ८ प्रमाणे कार्यालयीन पावतीच्या मागे स्वाक्षरी केली पाहिजे. त्याशिवाय त्यांना सभासदत्वाचा अधिकार प्राप्त होणार नाही. प्रचारकांनी हा नियम सभासद बनवितांना लक्षांत असू द्यावा अशी विनंती आहे.

(५) जे प्रचारक सभासद बनवितील त्यांनी त्या सभासदांची वर्गणी व कार्यालयीन पावत्या तावडतोब केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवाव्या. केवळ सभासदांचीं नांवें व वर्गणी पाठविली पण कार्यालयीन पावत्या पाठविल्या नाहीत, तर तीं नांवें सभासद म्हणून नोंदणी–वहींत नमूद केलीं जाणार नाहीत व मग कार्यालयावर कसलीहि जबाबदारी राहणार नाही.

तरी सभासदांनी व प्रचारकांनी या कार्यांत सहकार्य द्यावें अशी नम्र विनंती आहे.

केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

ल. वि. पांढरीपांडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सदस्यांना विनंती

विदर्भ साहित्य संघाचें नवें वर्ष एप्रिल १९५९ पासून सुरू होत आहे. सदस्यांनी आपली वर्गणी एप्रिल ३० च्या आंत भरण्याची कृपा करावी. एप्रिल ५९ चा 'युगवाणी'चा वर्षारंभांक सर्व सदस्यांना पाठविला जात आहे.

पुढील अंक नवीन वर्षाची वर्गणी भरून सदस्य होणारांसच पाठविला जाईल.

सरचिटणीस, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

विदर्भ साहित्य संघाचें उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी–प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✳ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हे मासिक श्री पुरुषोत्तम दिवाकर ढवळे उपाध्यक्ष, वि. सा. संघ यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका